# चालू घडामोडी

# नोव्हेंबर 2024

**THE OFFICER**
Your Personal Mentor

We have been Recognised By...

Stanford | Seed
Stanford Institute for Innovation in Developing Economies




- जागतिक हवामान बदल परिषद (COP29)-2024
- संजीव खन्ना भारताचे नवे सरन्यायाधीश
- समांथा हार्वे यांच्या 'ऑर्बिटल'ला बुकर
- व्हिक्टोरिया थेलविग 'मिस युनिव्हर्स'
- जी - 20 परिषद : 2024
- पंत 'आयपीएल'च्या इतिहासातील सर्वाधिक महागडा खेळाडू
- महाराष्ट्रात महायुतीचा विजय


The Officer Your Personal Mentor, 1st floor,
Palak Heights, Above Hotel Appa,
Near LIC Building (Z bridge side), Alka Chowk,
Narayan Peth, Pune - 30


9665666195 / 9665288834

THE OFFICER
Your Personal Mentor

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| 1. भारत व जग | 4 |
| 2. राजकीय व घटनात्मक | 14 |
| 3. आर्थिक | 28 |
| 4. नियुक्ती | 30 |
| 5. दिनविशेष | 35 |
| 6. विज्ञान व तंत्रज्ञान | 47 |
| 7. निधन | 52 |
| 8. कृषी व पर्यावरण | 57 |
| 9. सामाजिक व शैक्षणिक | 66 |
| 10. विविधा | 69 |
| 11. क्रीडा | 77 |
| 12. पुरस्कार | 82 |
| 13. संरक्षण व सुरक्षा | 94 |
| 14. आरोग्य व पोषण | 102 |


THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
CHRISTMAS AND NEW YEAR
निमित्त खास ऑफर
UPSC
MPSC
TILL 31 DEC 2024
प्रत्येक कोर्स वर
FLAT 25% OFF
ON ONE TIME PAYMENT
OFFER AVAILABLE ON
1 YEAR UPSC
Intensive Learning Program
1 YEAR MPSC
Intensive Learning Program
स्वाध्याय
उत्तर लेखन सराव
( UPSC / MPSC )
( UPSC / MPSC )
SOCIOLOGY
COMBINE EXAM
GROUP B & C
The Officer Your Personal Mentor, 1st floor,
Palak Heights, Above Hotel Appa,
Near LIC Building (Z bridge side), Alka Chowk,
Narayan Peth, Pune - 30
9665666195 / 9665288834



# 1. भारत व जग

## अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प



❖ संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत माजी अध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरीस यांचा पराभव केला.

**डोनाल्ड ट्रम्प**

- ✓ ***पक्ष :*** *रिपब्लिकन (चिन्ह - हत्ती)*
- ✓ ***प्रतिस्पर्धी :*** *कमला हॅरिस (पक्ष - डेमोक्रॅटिक)*
- ✓ *अमेरिकेचे **47 वे** अध्यक्ष*
- ✓ *2016 मध्ये पहिल्यांदा अध्यक्ष झाले होते.*
- ✓ *अमेरिकेचे अध्यक्षपदी निवडून आलेले **सर्वात वयोवृद्ध** व्यक्ती (वय - 78)*
- ✓ *एक उद्योजक दिग्गज बांधकाम व्यवसाय रियालिटी टीव्ही स्टार अन दोषी ठरवले गेलेले देशाचे पहिले माजी अध्यक्ष.*

❖ डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे 47 वे अध्यक्ष म्हणून शपथ घेणार असून त्यांची ही अध्यक्ष पदाची दुसरी टर्म असेल .

- बहुमतासाठी आवश्यक असलेला 270 मतांचा टप्पा ट्रम्प यांनी पार केला .
- ट्रम्प यांना 292 मते पडली तर कमला हॅरीस यांना 224 मते पडली.

**ट्रम्प यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा**

- ✓ *न्यूयॉर्क राज्यातील क्वीन्स येथे 14 जून 1946 रोजी जन्म*
- ✓ *वडील फ्रेड ट्रम्प बांधकाम क्षेत्रातील यशस्वी विकासक*
- ✓ *न्यूयॉर्क मिलिटरी अकादमी, पेन्सिल्व्हेनिया विद्यापीठाच्या व्हार्टन स्कूल ऑफ फायनान्स अँड कॉमर्स येथे शिक्षण*
- ✓ *1971 मध्ये वडिलांचा व्यवसाय हाती घेतला*
- ✓ *हॉटेल, रिसॉर्ट, निवासी आणि व्यावसायिक इमारती, कॅसिनो आणि गोल्फ कोर्सचे अनेक प्रकल्प*
- ✓ *एकूण संपत्ती - सहा अब्ज डॉलर*
- ✓ *ट्रम्प यांच्या मालकीचे अनेक गोल्फ कोर्स, मोठमोठे बंगले, वायनरी आणि 1991चे बोइंग 757 विमान आहे. या विमानाचे नाव त्यांनी 'ट्रम्प फोर्स वन' असे ठेवले आहे.*
- ✓ *'द आर्ट ऑफ द डील' हे पहिले पुस्तक 1987मध्ये प्रसिद्ध, त्यानंतर अनेक पुस्तकांचे लेखन*
- ✓ *2004 मध्ये 'द अ‍ॅप्रेन्टिस' या रिॲलिटी टीव्ही कार्यक्रमाला सुरुवात*
- ✓ *2016 साली 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या घोषणेसह अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी*
- ✓ *अध्यक्ष म्हणून महत्त्वाच्या कर सुधारणा विधेयकावर स्वाक्षरी*
- ✓ *संरक्षणवादाला प्राधान्य देताना परदेशी अ‍ॅल्युमिनियम, पोलाद आणि अन्य उत्पादनांवरील आयात शुल्कात वाढ*
- ✓ *मेक्सिको, कॅनडा, चीन, जपान आणि दक्षिण कोरिया या देशांशी व्यापार करारावर फेरवाटाघाटी*
- ✓ *सर्वोच्च न्यायालय, फेडरल न्यायाधीशांच्या नेमणुका, लष्करी खर्चात वाढ, सीमा व इमिग्रेशनवर आक्रमक नियंत्रण, गुन्हेगारी कायदा सुधारणा आणि औषधांच्या किमतींमध्ये घट यासंबंधी महत्त्वाचे निर्णय*

**अमेरिका**
**(United States of America - अमेरिकेची संयुक्त संस्थाने)**




- **खंड :** उत्तर अमेरिका
- **राजधानी :** वॉशिंग्टन डी.सी.
- **सर्वात मोठे शहर :** न्यू यॉर्क शहर
- **अधिकृत भाषा :** इंग्लिश

- अमेरिकन डॉलर हे अमेरिकेचे चलन आहे.
- 19 नोव्हेंबर 1493 रोजी क्रिस्टोफर कोलंबस या युरोपियन दर्यावर्दीला अमेरिकेचा शोध लागला.
- 4 जुलै 1776 रोजी अमेरिकेला ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाले.
- या देशात 50 राज्ये (संस्थाने) आहेत.
- या देशाचा वार्षिक सकल उत्पन्नात जगात पहिला क्रमांक आहे.
- **अर्थव्यवस्था :** भांडवलशाही

भौगोलिकदृष्ट्या कॅनडा, मेक्सिको हे अमेरिकेचे शेजारी देश आहेत, तसेच अमेरिकेच्या सागरी सीमा रशिया, कॅनडा व बहामाज् ह्या देशांना लागून आहे.

## मॉरीशसच्या पंतप्रधानपदी डॉ. नवीन रामगुलाम यांची निवड



- ❖ मॉरीशसमध्ये झालेल्या निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवत डॉ.नवीन रामगुलाम यांची पंतप्रधान पदी निवड करण्यात आली.अलायन्स डू चेंजमेंटच्या युतीत त्यांनी विजय मिळवला.
- ❖ मॉरिशसचे पहिले पंतप्रधान, सीवूसागुर रामगुलाम यांचे पुत्र, नवीन रामगुलाम हे मॉरिशसमधील नेतृत्वाचा इतिहास असलेली एक प्रमुख राजकीय व्यक्ती आहे.
- ❖ त्यांच्या अलायन्स ऑफ चेंज मोहिमेने देशाच्या आर्थिक आणि सामाजिक आव्हानांना सामोरे जाण्यावर लक्ष केंद्रित केले, राष्ट्रीय सुधारणा आणि आंतरराष्ट्रीय भागीदारी यांवर लक्ष केंद्रित केले.

***राजकीय प्रवास***

- ✓ *1991 ते 1995 पर्यंत विरोधी पक्षनेते होते.*
- ✓ *डिसेंबर 1995 ते सप्टेंबर 2000 पर्यंत त्यांनी पहिल्यांदा पंतप्रधान म्हणून काम केले आणि त्यानंतर ऑक्टोबर 2000 ते 4 जुलै 2005 पर्यंत ते पुन्हा विरोधी पक्षनेते बनले.*
- ✓ *5 जुलै 2005 रोजी ते पंतप्रधान झाले. त्यांच्या युती, अलायन्स सोशल, सार्वत्रिक निवडणुका जिंकल्यानंतर दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले .*
- ✓ *2005 मध्ये ते पुन्हा पंतप्रधान म्हणून निवडून आले. 2014 मध्ये ते पराभूत झाले.*
- ✓ *राजकीय पक्ष : मजूर पक्ष*

## न्यायाधीशांच्या निवडणुकीला मान्यता देणारा मेक्सिको पहिला देश



- मतदारांना सर्व स्तरांवरील न्यायाधीश निवडण्याची परवानगी देणारा मेक्सिको हा पहिला देश ठरला आहे.
- 2025 किंवा 2027 मध्ये सुमारे 1,600 न्यायाधीशांना निवडणुकीसाठी उभे राहावे लागेल.

## अणुऊर्जा प्रकल्प पूर्ण करणारा संयुक्त अरब अमिराती पहिला अरब देश



- अबुधाबीतील बाराका अणुऊर्जा प्रकल्प हा अरब जगातील पहिला पूर्णपणे कार्यान्वित अणुऊर्जा प्रकल्प ठरला आहे.
- प्रकल्पाच्या चौथ्या अणुभट्टीने व्यावसायिक कामकाज सुरू केले आहे.
- वार्षिक 40 टेरावॅट-तास ची एकूण उत्पादन क्षमता असणारा हा प्रकल्प युएईच्या विजेच्या मागणीच्या 25% पूर्ण करणार आहे.
- बाराका प्रकल्पातून अबू धाबी नॅशनल ऑइल कंपनी, एमिरेट्स स्टील आणि एमिरेट्स ग्लोबल ॲल्युमिनियमसह प्रमुख उद्योगांना वीज मिळेल.

## स्वित्झर्लंड : जगातील सर्वोत्कृष्ट देश



- 'बेस्ट कंट्रीज फॉर 2024' या नावाने करण्यात आलेल्या नव्या सर्वेक्षणानुसार स्वित्झर्लंड हा जगातील सर्वोत्कृष्ट देश ठरला आहे.
- स्वित्झर्लंडने सलग तिसऱ्या वर्षी हे यश मिळवले आहे.
- गेल्या वर्षीच्या तुलनेत 2024 मध्ये भारत तीन स्थानांनी घसरून 33 व्या क्रमांकावर आला आहे.

## जी - 20 परिषद : 2024



- जगातील आघाडीच्या अर्थव्यवस्थांचा महत्त्वपूर्ण गट असलेल्या 'जी-20' गटाची शिखर परिषद रिओ द जानेरोमध्ये सुरू झाली.
- ब्राझीलचे अध्यक्ष लुइझ इनाशिओ लुला डिसिल्वा यांनी परिषदेला सुरुवात करताना गरिबी, भूक आणि हवामान बदलासारख्या संकटांचा सामना करण्याचे आवाहन केले.
- डिसिल्वा यांनी परिषदेसाठी आगमन झालेल्या राष्ट्रप्रमुखांचे स्वागत केले.
- मोदी यांच्यासह अमेरिकेचे मावळते अध्यक्ष ज्यो बायडेन, चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रोन, ब्रिटन चे पंतप्रधान किर स्तार्मर इत्यादी महत्त्वाचे नेते या परिषदेसाठी दाखल झाली आहेत.

## 37 वर्षानंतर इराकमध्ये राष्ट्रीय जनगणना



- इराकमध्ये 20 नोव्हेंबर पासून राष्ट्रीय जनगणनेला सुरुवात झाली.
- गेल्या काही वर्षांपासून हिंसाचार आणि राजकीय अस्थैर्याने त्रस्त असलेल्या या देशामध्ये तब्बल 37 वर्षांनी अशा प्रकारची जनगणना होत आहे.
- डेटा संकलन आणि नियोजन यांचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.
- इराकच्या साधनसंपत्तीचे वितरण, अंदाजपत्रकात वाटपाची तरतूद आणि विकासाचे नियोजन यावर या जनगणनेचा मोठा परिणाम होण्याची अपेक्षा आहे.
- इराक मधील अखेरची जनगणना 1987 मध्ये झाली होती त्यानंतर 1997 मध्ये जनगणना झाली होती पण त्यामध्ये कुर्दबहुल प्रदेश वगळण्यात आला होता.

**जनगणनेची प्रक्रिया**

- ✓ संपूर्ण इराकमध्ये 1 लाख 20 हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.
- ✓ ते दोन दिवसांमध्ये 160 घरे याप्रमाणे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करतील.
- ✓ या उपक्रमामुळे डेटा संकलन व विश्लेषण करण्यासाठी तसेच इराकचे लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि आर्थिक चित्र स्पष्ट होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

जनगणना कालावधीत राष्ट्रीय संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

✓ मानवतावादी कारणांचा अपवाद वगळता नागरिक, वाहने आणि रेल्वेच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

## रियाध डिझाईन कायदा कराराच्या अंतिम कायद्यावर भारताची स्वाक्षरी



❖ जवळपास दोन दशकांच्या वाटाघाटीनंतर जागतिक बौद्धिक संपदा संघटनेच्या (WIPO) सदस्य देशांनी डिझाइन कायदा करार (DLT) या उल्लेखनीय कराराला स्वीकृती दिली आहे.

❖ रियाध डिझाइन कायदा कराराच्या अंतिम मसुद्यावर स्वाक्षरी करून, भारताने आपल्या प्रगतीसोबतच समावेशक वाढीला चालना देण्याच्या आणि बौद्धिक संपदेच्या रक्षणासाठी समान संधी उपलब्ध होतील याची खबरदारी घेण्याबद्दलच्या आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे.

❖ या कराराच्या माध्यमातून औद्योगिक डिझाइनच्या संरक्षणासाठी प्रक्रियात्मक नियमांच्या चौकटींमध्ये मेळ साधण्याचा तसेच विविध अधिकारक्षेत्रांमधील नोंदणी प्रक्रियांच्या कार्यक्षमतेत आणि सुलभतेत वाढ करण्याचा प्रयत्न आहे.

❖ प्रक्रियात्मक आवश्यकतांच्या प्रमाणीकरणाद्वारे प्रशासकीय भार कमी करून हा करार (डीएलटी) एकप्रकारे डिझाइनच्या बाबतीत जगभरातील सर्जनशीलतेला प्रोत्साहन देईल.

❖ सुविहित केलेल्या डिझाईन संरक्षण नियमांचे लाभ सर्व भागधारकांना विशेषत: लहान आणि मध्यम- उद्योग (SME), स्टार्ट-अप आणि स्वतंत्र डिझायनर्सना मिळतील याची खात्री करणे हा त्याचा उद्देश आहे.

❖ डिझाइनसाठी अर्ज करणाऱ्यांसाठी लाभदायक ठरतील अशा अनेक महत्त्वाच्या तरतुदींचा डीएलटीमध्ये समावेश करण्यात आला आहे, त्यामध्ये वेळेची मर्यादा शिथिल करणे, गमावलेले अधिकार पुन्हा प्राप्त करणे, प्राधान्याच्या दाव्यांमध्ये दुरुस्ती करण्याचा किंवा त्यामध्ये नवीन भर घालण्याचा पर्याय, असाइनमेंट आणि परवान्यांच्या नोंदीसाठी सुलभ प्रक्रिया आणि एकाच अर्जामध्ये

एकापेक्षा जास्त डिझाइन सादर करण्याच्या पर्यायांचा समावेश आहे.

या बदलांमुळे डिझाइनसाठी अर्ज करणाऱ्यांना अधिक लवचिकता मिळणार आहे.

- ❖ या व्यतिरिक्त, हा करार कंत्राट प्रक्रियेत सहभागी असलेल्या पक्षांना इलेक्ट्रॉनिक औद्योगिक डिझाइन प्रणाली अंमलात आणण्यास आणि प्राधान्य दस्तऐवजांची इलेक्ट्रॉनिक प्रणालीमार्फत सुलभपणे देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन देणारा आहे.
- ❖ स्टार्टअप इंडिया कार्यक्रम तसेच स्टार्टअप्स बौद्धिक संपदा संरक्षण (SIPP) योजना यांसारख्या उपक्रमांसोबत त्याचा वापर केल्यास , या तरतुदी स्टार्टअप्स आणि SMEs ला जागतिक स्तरावर त्यांचे डिझाइनविषयक अधिकार सुरक्षित ठेवण्यास सक्षम बनविण्याबरोबरच, त्यांच्या स्पर्धात्मकतेला चालना देण्यास आणि बाजारात त्यांच्या वाढीस पाठबळ मिळण्यासाठीही सहाय्यक ठरतील.
- ❖ सर्जनशीलता आणि कारागिरीचा समृद्ध वारसा लाभलेल्या भारताने शाश्वत आर्थिक विकासामध्ये असलेली डिझाइन या क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका हेरली आहे.
- ❖ डिझाईनच्या संरक्षणावर देशाने धोरणात्मक भर दिल्याने नवोन्मेषासाठी उत्प्रेरक ठरण्याच्या रुपाने त्याचा प्रभावी परिणाम झाला आहे.
- ❖ गेल्या दशकात, भारतात डिझाईनच्या नोंदणीचे प्रमाण तिप्पट झाले आहे, गेल्या केवळ दोन वर्षांत देशांतर्गत डिझाईन नोंदणीत 120% वाढ झाली आहे.
- ❖ विशेष म्हणजे गेल्या वर्षी डिझाइनसाठी दाखल झालेल्या अर्जांची संख्या 25% नी वाढली.

## मुलांना समाजमाध्यमावर बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया पहिला देश



- ❖ ऑस्ट्रेलियामध्ये 16 वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमे वापरण्यावर बंदी घालणारा कायदा मंजूर करण्यात आला.
- ❖ हा कायदा फेसबुक, स्नॅपचॅटसारख्या इन्स्टाग्रामपासून सर्व समाजमाध्यमांना लागू असून नियमभंग केल्यास कंपन्यांना 32 दशलक्ष अमेरिकन डॉलर इतक्या दंडाची तरतूद नव्या कायद्यात करण्यात आली आहे.
- ❖ मुलांना समाजमाध्यम वापरावर बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश ठरला आहे.

- 'समाजमाध्यम वयोमर्यादा किमान विधेयक' ऑस्ट्रेलियाच्या सिनेटमध्ये 34 विरुद्ध 19 मतांनी मंजूर करण्यात आला.
- कनिष्ठ सभागृहात 102 विरुद्ध 13 अशा घवघवीत मताधिक्याने या विधेयेकावर मान्यतेची मोहोर उमटवली होती.
- नव्या कायद्यानुसार 16 वर्षांखालील मुलांना टिकटॉक, फेसबुक, स्नॅपचॅट, रेडिट, एक्स (ट्विटर) आणि इन्स्टाग्राम या समाज माध्यमांवर खाती उघडण्यास बंदी असेल. याची अंमलबजावणी करण्यासाठी कंपन्यांना एक वर्षाचा कालावधी देण्यात आला असून त्यानंतर मात्र मोठ्या रकमेचा दंड कंपन्यांना भरावा लागेल.
- नव्या कायद्यावर ऑस्ट्रेलियामध्ये मतमतांतरे आहेत. बालहक्क संघटनांनी कायद्याला विरोध केला असला तरी पालकांकडून मात्र नव्या कठोर नियमांचे स्वागत केले गेले आहे.

## इच्छामरणाला ब्रिटनमध्ये प्राथमिक मान्यता



- इंग्लंड आणि वेल्स या प्रांतात असाध्य रोगामुळे मरणासन्न अवस्थेत असलेल्या प्रौढ रुग्णांना इच्छामरणाचा अधिकार देण्याऱ्या विधेयकाला ब्रिटिश खासदारांनी प्राथमिक मंजुरी दिली.
- या विधेयकावर संसदेत जोरदार चर्चा झाल्यानंतर खासदारांनी 'असिस्टेड डाइंग बिल' 330 विरुद्ध 275 मतांनी मंजूर केले.
- या विधेयकाला खासदारांची तत्त्वतः मंजुरी मिळाली असून, आता या विधेयकावर संसदेत अधिक अभ्यास केला जाईल.
- 2015 मध्ये असे विधेयक मांडण्यात आले होते परंतु त्याला मंजुरी मिळाली नव्हती.
- मरणासन्न अवस्थेत असणाऱ्यांना या विधेयकामुळे सन्मानपूर्वक मरण पत्करण्याचे स्वातंत्र्य मिळेल. त्यांना अनावश्यक वेदना, त्रास, दुःख सहन करावे लागणार नाही, असे आग्रही मत विधेयकाला समर्थन देणाऱ्यांचे आहे.
- खासदार किम लीडबीटर यांनी संसेदत हे विधेयक सादर केले. 'आपण इथे जीवन की मृत्यू अशा पर्यायांची निवडीचे स्वातंत्र्य देत नाही, तर मृत्यू कशा प्रकारे यावा, याची मोकळीक रुग्णाला देणार आहोत,' याकडे लीडबीटर यांनी लक्ष वेधले.
- तर ,डॅनी क्रूगर यांनी विधेयकाच्या विरोधात भूमिका घेतली.

## चीनमध्ये सोन्याची सर्वात मोठी खाण



- ❖ सोन्याचा जगातील सर्वांत मोठा साठा आता चीनमध्ये सापडला आहे. या खाणीचे मूल्य 83 अब्ज अमेरिकी डॉलर असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.
- ❖ दक्षिण आफ्रिकेतील 'साउथ डीप' खाणीला मागे टाकून हा आतापर्यंतचा सर्वांत मोठा सोन्याचा साठा आहे, ज्यात सुमारे 900टन साठा आहे.
- ❖ चीनमध्ये सापडलेल्या या खाणीमध्ये उच्च प्रतीच्या खनिजाचा साठा असल्याचा अंदाज आहे.
- ❖ चीनच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी हे वृत्त दिले आहे.
- ❖ हुनान प्रांताच्या भूवैज्ञानिक विभागाने याबाबतचे शोधकार्य केले.
- ❖ पिंगजियांग भागात ही खाण आहे.
- ❖ भूगर्भशास्त्रज्ञांनी दोन किलोमीटर खोलीवर सोन्याचे 40 पट्टे शोधले आहेत.
- ❖ दरम्यान, सोन्याच्या या नव्या खाणीच्या शोधाचा चीनच्या सोने उद्योगावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.
- ❖ सध्या चीन जागतिक पातळीवर सोन्याच्या उत्पादनात आघाडीवर आहे.
- ❖ जगातील सोन्याच्या बाजारपेठेत चीनचा दबदबा असून 2024 मध्ये चीनकडे दोन हजार टनांपेक्षा जास्त सोन्याचा साठा असल्याचे मानले जात होते.

*****


THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
UPSC / MPSC
निबंधलेखन
ACHIEVE ESSAY EXCELLENCE IN LESS THAN
30 Days!
Google Meet
LIVE ON
त्वरा करा प्रवेश मर्यादित
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
1:1 Perspnal Mentoring
25 नमुना निबंधांचे मुद्देसुद मसुदे
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
Virtual Library ची सुविधा
अमर्याद Watch Time
Printed Notes available
Course Validity - 3 months
9665666195 / 9665288834
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16



# 2. राजकीय व घटनात्मक

## आरसीपी यांची नवीन पक्षाची घोषणा



- बिहारचे मुख्यमंत्री व संयुक्त जनता दलाचे (जदयू) सर्वेसर्वा नितीशकुमार यांचे एकेकाळचे निकटवर्तीय रामचरण प्रसाद ऊर्फ आरसीपी सिंह यांनी नवीन पक्ष स्थापन करीत असल्याची घोषणा केली.
- 'आप सबकी आवाज' असे त्यांच्या पक्षाचे नाव असेल.
- पुढील वर्षी बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. 243 पैकी 140 जागांवर निवडणूक लढवण्याची संकेत दिले.
- प्रशासकीय अधिकारी राहिलेले आरसीपी सिंह यांनी नंतर राजकारणात प्रवेश केला होता.

## शमिभा पाटील पहिल्या तृतीयपंथी उमेदवार



- रावेर मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार शमिभा पाटील या पक्षाच्या माध्यमातून विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या राज्यातील पहिल्याच तृतीयपंथी अधिकृत उमेदवार ठरल्या आहेत.
- राज्याच्या 64 वर्षांच्या इतिहासात एखाद्या पक्षाकडून अधिकृत उमेदवार म्हणून तृतीयपंथी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची ही पहिलीच वेळ आहे.
- रावेर मतदारसंघातील केळी मजुरांच्या समस्यांसाठी केळी मजूर विकास महामंडळाचा मुख्य मुद्दा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या शमिभा पाटील यांनी - सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.
- मागील 15 वर्षांपासून शमिभा पाटील तृथीयपंथींसह आदिवासी व भटक्यांच्या हक्कासाठी लढत असून, पाच वर्षांपासून त्या वंचित बहुजन आघाडीचे काम करीत आहेत.

***शमिभा यांच्याविषयी***

- ✓ *भुसावळ येथील रहिवासी असलेल्या शमिभा पाटील यांचे मूळ नाव श्याम भानुदास पाटील असे आहे.*
- ✓ *फैजपूर येथून त्यांनी एम. ए. मराठीची पदवी घेतली. सध्या त्या कवी ग्रेस यांच्या साहित्यावर पीएच.डी. करीत आहेत.*
- ✓ *त्यांनी वयाच्या तिसाव्या वर्षी अर्थात, नऊ वर्षांपूर्वी तृतीयपंथी असल्याचे जाहीर केले.*
- ✓ *2014 मध्ये त्यांना तृतीयपंथी म्हणून नागरिकत्वदेखील मिळाले.*
- ✓ *तेव्हापासून त्या तृतीयपंथींच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरून लढा देत आहेत.*
- ✓ *पोलिस भरतीमध्ये तृतीयपंथींना आरक्षण मिळण्यासाठीदेखील त्यांनी न्यायालयीन लढा दिलेला आहे.*

**शबनम पहिल्या आमदार**



❖ *भारतात तृतीयपंथींना 1994 मध्ये प्रथमच मतदानाचा अधिकार मिळाला होता.*

❖ *तीस वर्षांपूर्वी 1998 ते 2003 - या काळात मध्य प्रदेशमधील भोपाळमधून शबनम मौसी या भारतातील पहिल्या तृतीयपंथी - आमदार म्हणून निवडून आलेल्या होत्या.*

## जम्मू-काश्मीर विधानसभा अध्यक्षपदी राथेर यांची निवड



❖ नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ नेते आणि जम्मू-काश्मीरच्या चरार-ए-शरिफ येथून सात वेळा आमदारकी भूषविणारे अब्दुल रहीम राथेर यांची जम्मू-काश्मीर विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड झाली.

❖ सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यानंतर जावेद अहमद दार यांनी अध्यक्षपदाच्या नावासाठी राथेर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला तर त्याला नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार रामबन व अर्जुनसिंह राजू यांनी पाठिंबा दिला.

❖ जम्मू-काश्मीरमधील विरोधी पक्षांनी या निवडणुकीमध्ये सहभागी न होण्याचा निर्णय घेतल्याने हंगामी अध्यक्ष मुबारक गुल यांनी आवाजी मतदान घेत राथेर यांची निवड केली.

## अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा अल्पसंख्यांक दर्जा कायम



❖ अलिगढ मुस्लीम विद्यापीठाच्या (एएमयू) अल्पसंख्याक दर्जाविषयीचे प्रकरण नियमित खंडपीठाकडे पाठविण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून घेण्यात आला आहे.

❖ यासोबतच विद्यापीठाची स्थापना केंद्रीय कायद्यानुसार न झाल्याने हे विद्यापीठ अल्पसंख्याक संस्था मान्य करता येत नाही, हा 1967 चा निर्णयदेखील सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला.

❖ सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी 4:3 या बहुमताच्या निर्णयात अल्पसंख्यक

दर्जाविषयीचे मुद्दे विचारार्थ मांडताना मापदंडही निश्चित केले.

❖ यावेळी झालेल्या सुनावणीवेळी खंडपीठातील न्या. संजीव खन्ना, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांनी एकमताने तर न्या. सूर्यकांत, न्या. दीपांकर दत्ता यांनी मतभिन्नता दर्शविली.

❖ 1967 मध्ये पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने एस अझीझ बाशा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया खटल्यात एएमयू हे केंद्रीय विद्यापीठ आहे. आणि त्यामुळे ती अल्पसंख्याक संस्था मानली जाऊ शकत नाही, असा निर्णय दिला होता.

***अलिगढ मुस्लिम विद्यापीठ***



- ✓ ***स्थापना :*** *1875, अलिगढ (उत्तर प्रदेश)*
- ✓ ***संस्थापक :*** *सर सय्यद अहमद खान*
- ✓ *भारतीय राज्यघटनेच्या सातव्या अनुसूचीनुसार अलीगढ मुस्लिम विद्यापीठ ही राष्ट्रीय महत्त्वाची संस्था मानली जाते.*
- ✓ ***नईमा खातून*** *या अलीगड मुस्लिम विद्यापीठाच्या कुलगुरू आहेत. विद्यापीठाच्या इतिहासातील त्या* ***पहिल्या महिला कुलगुरू*** *आहेत. यांनी अलीगढ मुस्लिम विद्यापीठातून मानसशास्त्रात पीएचडी मिळवली आणि 1988 मध्ये मानसशास्त्र विभागात लेक्चरर म्हणून रुजू झाल्या. 1999 ते 2000 या एक वर्षाच्या कालावधीसाठी रवांडा राष्ट्रीय विद्यापीठात त्यांनी सहयोगी प्राध्यापक म्हणूनही काम केले.*
- ✓ *1875 साली सर सय्यद अहमद खान ह्या शिक्षणतज्ज्ञाने मोहमेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेजची स्थापना केली. 1920 साली त्याचे रूपांतर अलीगढ मुस्लिम विद्यापीठामध्ये झाले.*
- ✓ *प्रामुख्याने भारतामधील मुस्लिम धर्मीय विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या ह्या विद्यापीठामध्ये सध्या सर्व धर्माच्या व जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश खुला आहे.*
- ✓ *शेख अब्दुल्ला ("पापा मियाँ") हे अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या महिला महाविद्यालयाचे संस्थापक आहेत.*

**हमारा संविधान, हमारा सम्मान अभियान**




❖ 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारलेली आणि 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आलेली भारतीय राज्यघटना भारताच्या लोकशाही,

धर्मनिरपेक्ष आणि समतावादी चौकटीची व्याख्या करणारा मूलभूत दस्तऐवज आहे.

- ❖ गेल्या सात दशकांमध्ये, संविधानाने देशाला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले आहे, तसेच न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही भारताच्या शासनाची मुख्य तत्त्वे सुनिश्चित केली आहेत.
- ❖ दरवर्षी संविधान दिनी ही मूल्ये साजरी केली जातात.

**भारताच्या घटनात्मक भावनेचा उत्सव**

- ○ भारतीय संविधान स्वीकारल्या प्रीत्यर्थ दरवर्षी 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन किंवा संविधान दिवस साजरा केला जातो.
- ○ नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने 19 नोव्हेंबर 2015 रोजी घोषित केले की केंद्र सरकार दरवर्षी 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करेल.
- ○ राष्ट्राला मार्गदर्शन करणाऱ्या लोकशाही तत्त्वांचे स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो.
- ○ घटनात्मक मूल्यांप्रति जागरूकता निर्माण करण्याच्या या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, हमारा संविधान, हमारा सम्मान अभियान सुरू करण्यात आले आहे.

**"हमारा संविधान, हमारा सम्मान " अभियान**

- ✓ 24 जानेवारी 2024 रोजी उपराष्ट्रपतींनी नवी दिल्लीतील डॉ. बी.आर. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र येथे "हमारा संविधान, हमारा सम्मान " अभियान सुरु केले ज्याचा उद्देश संविधानाविषयी नागरिकांची समज वाढवणे हा आहे.
- ✓ वर्षभर चालणाऱ्या या अभियानात भारतीय समाजाला आकार देण्यात राज्यघटनेच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करणे आणि नागरिकांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल शिक्षित करणे, याची खात्री करणे आहे.
- ✓ जेणेकरून ही मूलभूत तत्त्वे प्रत्येक भारतीयाच्या मनात प्रतिध्वनित होत राहतील.

**प्रादेशिक कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम**

- ▪ "हमारा संविधान, हमारा सन्मान"या वर्षभर चालणाऱ्या मोहिमेची सुरुवात मार्च 2024 मध्ये बिकानेर येथील पहिल्या प्रादेशिक कार्यक्रमाने झाली.
- ▪ या कार्यक्रमाचे उद्घाटन सरन्यायाधीश डी.वाय.चंद्रचूड यांच्या हस्ते झाले होते.

**डिजिटल प्रतिबद्धता आणि नागरिकांचा सहभाग**

- "हमारा संविधान, हमारा सन्मान" मोहिमेचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे त्यातील डिजिटल प्रतिबद्धता.
- शिक्षण, लोकसहभाग आणि कृतीसाठी ऑनलाइन व्यासपीठ म्हणून काम करणाऱ्या समर्पित अशा या पोर्टलद्वारे नागरिकांना सक्रियपणे या मोहिमेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.
- या पोर्टलद्वारे, नागरिक त्यांच्या राज्यघटनेच्या ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी व्हिडिओ, लेख, इन्फोग्राफिक्स आणि प्रश्नमंजुषा यासारख्या संसाधनांपर्यंत पोहोचू शकतात.
- हे नागरिकांना प्रतिज्ञा घेण्यास आणि भारताचे भविष्य घडविण्यामध्ये राज्यघटनेच्या भूमिकेबद्दल ऑनलाइन चर्चेत सहभागी होण्यास अनुमती देते.

**2047 पर्यंत भारताच्या सुनिश्चित केलेल्या उद्दिष्टांना साकार करण्यात मोहिमेची भूमिका**

- प्रजासत्ताक भारताच्या 75 व्या वर्षाचा एक भाग म्हणून, "हमारा संविधान, हमारा सन्मान" ही मोहीम 2047 पर्यंत विकसित भारत या उद्दिष्टांना समर्थन देते.
- ही मोहीम नागरिकांना राष्ट्राच्या भविष्याला आकार देणारी राजकीय प्रक्रिया,संविधानिक मूल्ये जपण्यासाठी, लोकशाही तत्त्वांचा आदर करण्यासाठी राजनैतिक आणि कायदेशीररीत्या कार्य करण्यासाठी प्रोत्साहित करते.

## अखिल भारतीय पोलीस महासंचालक परिषद




- पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 30 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर 2024 या कालावधीत ओडिशा मधील भुवनेश्वर येथे आयोजित अखिल भारतीय पोलीस महासंचालक/महानिरीक्षक परिषद 2024 ला उपस्थित राहणार आहेत.
- भुवनेश्वरमधील लोकसेवा भवनातील राज्य संमेलन केंद्रात या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

- सदर परिषद ही दिनांक 29 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर 2024 अशी तीन दिवस चालणार असून यामध्ये नवीन फौजदारी कायदे, दहशतवादाला प्रतिबंध, डाव्या विचारसरणीचा अतिरेक, तटीय सुरक्षा, अंमली पदार्थांची तस्करी रोखणे, यासह राष्ट्रीय सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा होणार आहे.
- यासोबतच पोलीस सेवेतील उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकही या परिषदेदरम्यान प्रदान करण्यात येणार आहे.
- देशभरातल्या वरिष्ठ पोलिसांना आणि सुरक्षा प्रशासकांना राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर तसेच संचालन, पायाभूत सुविधा आणि पोलीस कल्याणविषयक विविध बाबींवर, भेडसावणाऱ्या अडचणींवर मुक्तपणे चर्चा करण्यासाठी एक संवादी व्यासपीठ, ही परिषद पुरवेल.
- अंतर्गत सुरक्षा धोक्यांसह, गुन्हेगारी नियंत्रण व कायदा आणि सुव्यवस्था संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व्यावसायिक पद्धती आणि प्रक्रियांचे सुसूत्रीकरण आणि सामायिकीकरण यासाठी ही चर्चा उपयुक्त ठरेल.
- या परिषदेसाठी पंतप्रधान कायम उत्सुक असतात. पंतप्रधान अत्यंत बारकाईने ही चर्चा ऐकतात, त्याचसोबत ते नव्या कल्पना पुढे याव्यात यासाठी अनौपचारिक आणि मुक्त वातावरणातल्या चर्चेला प्रोत्साहनही देतात. यावर्षी काही वैशिष्ट्यपूर्ण बाबी या परिषदेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.
- संपूर्ण दिवसाचे प्रभावी नियोजन करण्यात आले असून सुरुवात योग सत्राने होईल.
- कामकाज सत्र, सादरीकरण, चर्चा, कार्यशीलता सत्र, संकल्पना आधारित भोजन सत्र , अशी या परिषदेची वैशिष्ट्ये आहेत.
- देशाला प्रभावित करणाऱ्या क्रिटिकल पोलिसिंग आणि अंतर्गत सुरक्षेच्या बाबींवर, पंतप्रधानांसमोर आपले दृष्टिकोन आणि सूचना मांडण्याची मौल्यवान संधी यामुळे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना मिळेल.
- वार्षिक पोलीस महासंचालक/महानिरीक्षक परिषद देशातल्या विविध ठिकाणी व्हावी, यासाठी वर्ष 2014पासून पंतप्रधानांनी प्रोत्साहन दिले आहे.
- तेव्हापासून गुवाहाटी (आसाम), कच्छचे रण (गुजरात), हैदराबाद (तेलंगणा), टेकनपूर (ग्वाल्हेर, मध्य प्रदेश), स्टॅच्यू ऑफ युनिटी (केवडिया, गुजरात), पुणे (महाराष्ट्र), लखनौ (उत्तर प्रदेश), नवी दिल्ली आणि जयपूर

(राजस्थान) येथे ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

- ही परंपरा पुढे चालू ठेवत, भुवनेश्वर (ओडिशा) येथे 59 वी पोलीस महासंचालक/महानिरीक्षक परिषद 2024 आयोजित केली जात आहे.
- या परिषदेला केंद्रीय गृहमंत्री, पंतप्रधानांचे प्रधान सचिव, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, गृह राज्यमंत्री, राज्ये/केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस महासंचालक आणि केंद्रीय पोलीस संघटनांचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

## हेमंत सोरेन झारखंडचे 14 वे मुख्यमंत्री



- झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी रांची येथे एका भव्य सोहळ्यात झारखंडचे 14 वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.
- राज्याचे राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.
- विधानसभा निवडणुकीत झामुमोच्या नेतृत्वात इंडिया आघाडीने 81 पैकी 56 जागांवर विजय मिळवला असून हेमंत सोरेन हे त्यांच्या बारहैत मतदारसंघातून जवळपास 40 हजार मतांनी विजयी झाले आहेत.

## राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'ई-दाखिल' सुरू



- भारतातील प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात कार्यरत असलेल्या ई-दाखिल पोर्टलची राष्ट्रव्यापी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.
  हे कार्य करून ग्राहक व्यवहार खात्याने एक मैलाचा दगड म्हणता येईल असा टप्पा पार पाडला आहे.
- 22 नोव्हेंबर 2024 रोजी लडाखमध्ये अलीकडेच ई-दाखिल पोर्टल सुरू करण्यात आले आहे, ज्यामुळे ई-दाखिल हा खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतामध्ये कार्यरत असलेला उपक्रम बनला आहे.ग्राहकांसाठी परिणामकारक ठरतील अशा नवीन आणि उदयोन्मुख समस्यांचे निराकरण करण्यासाठी, ग्राहक संरक्षण कायदा 2019, अधिसूचित करण्यात आला आणि 20 जुलै 2020 रोजी लागू करण्यात आला.
- कोविड-19 मुळे ग्राहकांवरील निर्बंधांना सामोरे जाताना, 'ई-दाखिल पोर्टल' स्वस्त, वेगवान म्हणून सादर करण्यात आले. ग्राहकांच्या तक्रारी दाखल करण्यासाठी ही मोफत यंत्रणा आहे.
- ई-दाखिल म्हणजे ग्राहक तक्रार निवारण प्रक्रिया सुलभ करण्यासाठी डिझाईन केलेला एक नाविन्यपूर्ण ऑनलाईन प्लॅटफॉर्म आहे.

- ❖ यामुळे ग्राहकांना संबंधित ग्राहक मंचाशी संपर्क साधण्यासाठी एक कार्यक्षम आणि सोयीस्कर मार्ग प्रदान झाला आहे.
- ❖ त्यांच्या तक्रारी दाखल करण्यासाठी प्रवास करण्याची आणि प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता आता राहिली नाही.
- ❖ सुरुवातीपासूनच, ई-दाखिल ग्राहकांच्या हक्कांना चालना देण्यासाठी आणि वेळेवर न्याय सुनिश्चित करण्यासाठी एक 'गेम चेंजर' बनले आहे.
- ❖ ई -दाखिल पोर्टलवर वापरकर्त्याला आपली तक्रार दाखल करण्याची सुविधा सुलभतेने प्रदान केली आहे. तयामुळे ग्राहकांना कमीतकमी प्रयत्नात तक्रारी नोंदवता येतात.
- ❖ तक्रारी दाखल करण्यापासून ते त्यांच्या स्थितीचा मागोवा घेण्यापर्यंत, ई-दाखिल प्रकरणे दाखल करण्याच्या संदर्भात पेपरलेस आणि पारदर्शक प्रक्रिया सुनिश्चित करते.
- ❖ कोणताही ग्राहक किंवा वकील त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल फोनवर ओटीपी किंवा त्यांच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर सक्रियकरणाची लिंक प्राप्त करून आवश्यक प्रमाणीकरणासह ई-दाखिल प्लॅटफॉर्मवर 'साइन अप' करू शकतो.
- ❖ त्यानंतर ते तक्रार दाखल करून पुढे जाऊ शकतात. पोर्टलने सर्व पीडित ग्राहकांना त्यांच्या स्वत:च्या घरात राहून ग्राहक आयोगाकडे तक्रारी ऑनलाईन सादर करण्याची, योग्य शुल्क भरण्याची आणि प्रकरणाच्या प्रगतीचा ऑनलाईन मागोवा घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.
- ❖ ई-दाखिल पोर्टल प्रथम 7 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाने सुरू केले. 2023 च्या अखेरीस, हे लडाख वगळता 35 राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू करण्यात आले.
- ❖ आता, लडाखचे नायब राज्यपाल ब्रिगेडियर. (डॉ.) बी.डी. मिश्रा (सेवानिवृत्त) यांनी 22 नोव्हेंबर 2024 रोजी लडाख ग्राहक आयोगामध्ये ई-दखिल पोर्टल लाँच केले, हे व्यासपीठ महानगरांपासून दुर्गम भागांपर्यंत भारतातील सर्व क्षेत्रांतील ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.
- ❖ सध्या ई-दाखिल पोर्टलवर 2,81,024 हून अधिक वापरकर्त्यांनी नोंदणी केली आहे आणि 1,98,725 प्रकरणे दाखल करण्यात आली असून त्यापैकी 38,453 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत आणि आता ई-दाखिलचा आवाका देशव्यापी झाल्यामुळेख् संपूर्ण भारतातील ग्राहक हक्कांच्या परिघामध्ये क्रांती घडवून आणणे शक्य होणार आहे.

## आसाम मधील जिल्ह्याचे नाव बदलले



- आसाममधील होजाई जिल्ह्याच्या मुख्यालयाचे नाव आता श्रीमंत शंकरदेवनगर असे करण्यात आले आहे.
- मुख्यमंत्री हिमंता बिस्व शर्मा ही माहिती दिली.राज्य मंत्रिमंडळाने याबाबतचा निर्णय घेतला

**करीमगंज आता श्रीभूमी म्हणून ओळखले जाणारे**

- आसाम मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने 'करीमगंज' जिल्ह्याचेही नाव बदलण्याची घोषणा केली आहे.
- हे शहर आता 'श्रीभूमी' या नावाने ओळखले जाणार आहे.
- 'श्रीभूमी' हे नाव बदलल्याने आसामच्या विविधतेशी आणि इतिहासाशी जुळणाऱ्या जिल्ह्याच्या ओळखीला नवा आणि सांस्कृतिक संदर्भ मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.
- त्यांनी या निर्णयाचे वर्णन आसामचा सांस्कृतिक वारसा मजबूत करणारा असे केले.

**वन नेशन वन सबस्क्रिप्शन' ला मंजुरी**



- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळाने विद्वत्तायुक्त संशोधन लेख आणि पत्रिका प्रकाशनांची देशव्यापी उपलब्धता निर्माण करणाऱ्या वन नेशन वन सबस्क्रिप्शन या केंद्रीय योजनेला मंजुरी दिली.
- एका साध्या, वापरकर्ता स्नेही आणि संपूर्णपणे डिजिटल प्रक्रियेद्वारे ही योजना राबवली जाईल.
- सरकारी उच्च शिक्षण संस्था आणि केंद्र सरकारच्या संशोधन आणि विकास प्रयोगशाळांसाठी ही एक 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' सुविधा असेल.
- वन नेशन वन सबस्क्रिप्शनसाठी 2025,2026 आणि 2027 या तीन कॅलेंडर वर्षांकरिता एक नवी केंद्रीय योजना म्हणून सुमारे 6,000 कोटी रुपयांची एकूण तरतूद केली आहे.
- वन नेशन वन सबस्क्रिप्शन भारतातील तरुणांना दर्जेदार उच्च शिक्षण जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी, शिक्षण क्षेत्रात गेल्या दशकभरात भारत सरकारने हाती घेतलेल्या उपक्रमांची व्याप्ती आणि पोहोच वाढवेल.
- यामुळे संशोधन आणि विकासाला चालना देण्यासाठी आणि संशोधनाची आणि नवोन्मेषाची संस्कृती सरकारी विद्यापीठे,

महाविद्यालये, संशोधन संस्था आणि संशोधन आणि विकास प्रयोगशाळा या सर्वच ठिकाणी निर्माण करण्यासाठी हाती घेतलेल्या एएनआरएफ उपक्रमाला पूरक बळ मिळेल.

- वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजनेचे लाभ केंद्र किंवा राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या संशोधन आणि विकास संस्थांच्या व्यवस्थापनाखालील सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना मुख्यत्वे इन्फर्मेशन अँड लायब्ररी नेटवर्क या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आंतर विद्यापीठ स्वायत्त केंद्र असलेल्या केंद्रीय एजन्सीद्वारे समन्वयित राष्ट्रीय सदस्यत्वाद्वारे प्रदान केले जातील.
- या यादीमध्ये 6300 पेक्षा जास्त संस्था असून त्याद्वारे सुमारे 1.8 कोटी विद्यार्थी, शिक्षक समुदाय आणि संशोधक यांना या योजनेचे लाभ मिळतील. विकसितभारत@2047, राष्ट्रीय शिक्षण धोरण(एनईपी) 2020 आणि अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशन(एएनआरएफ) यांच्या उद्दिष्टांना अनुसरून हा उपक्रम आहे.
- या उपक्रमामुळे दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांसह देशभरातील सुमारे 1.8 कोटी विद्यार्थी, शिक्षक समुदाय, संशोधक आणि सर्व शाखांमधील शास्त्रज्ञांसाठी उच्च दर्जाच्या ज्ञानसंपन्न नियतकालिकांमध्ये उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे भांडार खुले होईल, ज्यामुळे देशातील प्रमुख क्षेत्रांमधील तसेच आंतरशाखीय संशोधनाला प्रोत्साहन मिळेल.
- वन नेशन वन सबस्क्रिप्शन आणि या संस्थांमधील भारतीय लेखकांच्या प्रकाशनांचा एएनआरएफ नियमित काळाने आढावा घेत राहील.
- उच्च शिक्षण विभागाचे ‘ वन नेशन वन सबस्क्रिप्शन’ हे एकीकृत पोर्टल असेल ज्यावर संबंधित संस्थांना या पत्रिका उपलब्ध असतील. सरकारी संस्थांनी या वैशिष्ट्यपूर्ण सुविधेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक समुदाय आणि सर्व सरकारी संस्थामधील संशोधकांना मिळावा यासाठी तिचा जास्तीत जास्त प्रचार करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## महाराष्ट्रात महायुतीचा विजय



- विधानसभा निवडणुकीत तमाम राजकीय विश्लेषक आणि बहुतांश मतदानोत्तर

चाचण्यांच्या अंदाजांपेक्षाही उत्तम कामगिरी करत महायुतीने जोरदार विजय संपादन केला.

- 288 पैकी तब्बल 235 जागा जिंकून महायुतीने महाविकास आघाडीचा पराभव केला.
- एकट्या भाजपला तब्बल 132 जागांवर विजय मिळाला.
- शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या पक्षांनीही जोरदार मुसंडी मारत उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांचा पराभव केला.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल 2024**

- ✓ भारतीय जनता पक्ष - 132
- ✓ शिवसेना/ शिंदे - 57
- ✓ राष्ट्रवादी/अजित पवार - 41
- ✓ शिवसेना/ठाकरे गट - 20
- ✓ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - 16
- ✓ राष्ट्रवादी/शरद पवार गट - 10
- ✓ इतर - 10
- ✓ अपक्ष – 02
- ✓ एकूण जागा - 288
- ✓ बहुमत - 144+1

**महाराष्ट्र 15 वी विधानसभा 2024 आढावा**

- 15 वी विधानसभा निवडणूक
- एकूण जिल्हे : 36
- एकूण मतदारसंघ : 288
- सर्वसाधारण मतदारसंघ : 234
- SC मतदारसंघ : 29
- ST मतदारसंघ : 25
- एकूण उमेदवार : 4136
- एकूण पक्ष उमेदवार : 158
- एकूण अपक्ष उमेदवार : 2086
- मतदान केंद्र : 1 लाख 183
- एकूण मतदार : 9,70,25,119
- पुरुष मतदार : 5,00,22,739
- महिला मतदार : 4,69,96,279
- तृतीयपंथीय मतदार : 6,101
- नवीन मतदार : 20 लाख 93 हजार
- तरूण मतदार : 1.85 कोटी
- अपंग मतदार : 6.36 लाख
- एकूण मतदान केंद्रे : 1,00,186
- शहरी केंद्रे : 42602
- ग्रामीण केंद्र : 57558
- **राज्यातील एकूण मतदानाची टक्केवारी : 66.05%.**
- सर्वाधिक मतदान करवीर येथे 84.96%.
- सर्वात कमी मतदान : कुलाबा येथे 44.44%.
- एकूण प्रत्यक्ष मतदान : 6 कोटी 40 लाख 88 हजार 195 मतदारांनी सहभाग घेतला.
- पुरुष मतदारांचे मतदान : 3 कोटी 34 लाख 37 हजार 57.
- महिला मतदारांचे मतदान : 3कोटी 6लाख 49 हजार 318.
- इतर मतदान : 1 हजार 820.


## झारखंडमध्ये 'मुक्ती मोर्चाचे' वर्चस्व

- हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखाली झारखंड मुक्ती मोर्चाने पुन्हा एकदा झारखंडमधील सत्ता कायम राखली आहे.
- 81 सदस्य असलेल्या विधानसभेत त्यांच्या पक्षाला 34 जागांवर यश मिळाले असून 'इंडिया' आघाडीतील काँग्रेसने 16 आणि राष्ट्रीय जनता दलाने 4 जागा जिंकल्या आहेत.
- त्यामुळे झारखंडमध्ये आघाडीचे सरकार कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले असताना भाजप 21 जागांसह दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे.

**पक्षनिहाय जिंकलेल्या जागा**

1) झामुमो 34
2) भाजप 21
3) काँग्रेस 16
4) राजद 04
5) इतर 06

*****


THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
Stanford | Seed
UPSC
PRELIMS MENTORSHIP CUM TEST SERIES PROGRAM 2025
Amol Ghodke Sir
OFFLINE + ONLINE
What We Offer:
• 27 Weeks of Expert Mentorship
• 27 Intensive GS & CSAT Tests
• Personalized Feedback & Weekly Analysis
• Milestone Checkpoints and Readiness Meter
• Mental Toughness & Stress Management Workshops
• Weekly Current Affairs Sessions
• Master Previous Year Questions & Model MCQs
• Build Confidence with Mentorship & Continuous Feedback
Google Meet
LIVE ON
Enroll Now and Take the First Step Towards Your Dream!
www.THEOFFICER.in
9665666195 / 9665288834
SCAN HERE
GET DETAIL PDF OF SCHEDULE & FEATURES
Offline Seminar Address
The Officer Your Personal Mentor, First Floor, Palak Heights, NC Kelkar Road, Near LIC Building, Alka Chowk, Pune - 30
Limited Seats Available – Reserve Yours Today!
Starting From: November 16, 2024



# 3. आर्थिक

## कोल इंडिया चे 50 व्या वर्षात पदार्पण

- भारताची कोळश्याची गरज पूर्ण करताना ऊर्जा क्षेत्रालाही बळकटी देणाऱ्या कोल इंडिया लिमिटेड (CIL) या सरकारी मालकीच्या कंपनीने 1 नोव्हेंबर 2024 रोजी 50 व्या वर्षात पदार्पण केले आहे.
- राष्ट्रीयीकृत कोकिंग कोल (1971) व नॉन कोकिंग खाणी (1973) यांची शिखर होल्डिंग कंपनी या नात्याने CIL 1 नोव्हेंबर 1975 रोजी स्थापन झाली.
- CIL च्या स्थापना वर्षात म्हणजे 1975-76 साली झालेल्या 89 मिलियन टन उत्पादनापासून सुरुवात करणाऱ्या या महारत्न कोळसा कंपनीने कोळसा मंत्रालयांतर्गत कार्यरत असताना आर्थिक वर्ष 2024 मध्ये 773. 6 मिलियन टन म्हणजे 8.7 पट अधिक उत्पादनाचा टप्पा पार केला आहे.
- CIL चे 80% कोळसा उत्पादन अतिशय रास्त दराने वीज उत्पादक क्षेत्राला दिले जाते आणि

अशा रीतीने नागरिकांना वाजवी दरात वीज पुरवठा होतो आहे.

- राष्ट्रीयीकरणानंतरच्या काळात असलेली 6.75 लाख कर्मचारी संख्या आता एक तृतीयांशाने घटून फक्त 2.25 लाख इतकी उरली आहे, तरीही उत्पादनात मोठी वाढ झाली आहे.
- CIL चा गेल्या 5 दशकांचा प्रवास अनेक महत्वाच्या घटनांनी अंकित झालेला आहे.
- कंपनीने अनेक आव्हाने व बदल तसेच कसोटीचे प्रसंग व समस्या समर्थपणे पेलत अपेक्षेप्रमाणे कार्यक्षमता दाखवली आहे.
- मुळात फक्त कोळसा उत्पादन करणाऱ्या कोल इंडियाने आता सौर ऊर्जा, पिटहेड ऊर्जा केंद्रे, कोळशाचे वायूत रूपांतरण व अतिमहत्वाच्या खनिजाचे उत्पादन करून राष्ट्रहिताला हातभार लावला आहे.

## ऑस्ट्रेलियात भारताच्या चौथ्या वाणिज्य कचेरीचे उदघाटन



- परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन येथे भारताच्या नव्या वाणिज्य कचेरीचे उद्घाटन केले.
- यामुळे भारत आणि ऑस्ट्रेलियातील व्यापाराला आणखी वेग येईल.
- सिडने, मेलबर्न आणि पर्थ या शहरांनंतर ऑस्ट्रेलियामधील ही भारताची चौथी वाणिज्य कचेरी आहे.

## राज्य शिखर बँकेचा केंद्राकडून गौरव



- राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव बँकेला उत्कृष्ट कामगिरीबद्दल केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते गौरविण्यात आले .
- दिल्लीत नॅफस्कॉब' च्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कणा असलेल्या राज्य सहकारी बँका, जिल्हा सहकारी बँका आणि विविध कार्यकारी संस्थांमधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना शहा यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

*****



# 4. नियुक्ती

## लालेंगमाविआ मिझोरामचे मुख्य सचिव




- एच. लालेंगमाविआ यांची कार्यवाहक मुख्य सचिव म्हणून नियुक्ती केली.
- विद्यमान मुख्य सचिव रेणू शर्मा यांच्या निवृत्तीच्या एका दिवसापूर्वी लालेंगमाविआ कार्यवाहक मुख्य सचिव म्हणून कार्यभार स्वीकारतील.
- लालेंगमाविआ सध्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल, उच्च आणि तांत्रिक शिक्षण आणि मत्स्य विभागांमध्ये आयुक्त आणि सचिव म्हणून कार्यरत आहे.

## संजय वर्मा महाराष्ट्राचे नवे पोलीस महासंचालक




- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने वरिष्ठ पोलीस अधिकारी

रश्मी शुक्ला यांना राज्याच्या पोलीस महासंचालक पदावरून हटवून त्यांच्या बदलीचे आदेश दिले होते. त्यानंतर, 5 नोव्हेंबर 2024 रोजी निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर संजय वर्मा यांची राज्याचे पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली.

- निवडणूक आयोगाने याबाबतचे आदेश काढल्यानंतर लगेचच वर्मा यांनी कार्यभार स्वीकारला.
- वर्मा 1990 च्या तुकडीचे अधिकारी असून कायदा व तांत्रिक विभागाचे संचालक म्हणून कार्यरत होते.
- त्यांनी कोल्हापूरमध्ये महानिरीक्षकपदाची जबाबदारीही सांभाळली होती. त्यावेळी, **कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाचे नेतृत्वही वर्मा यांनी केले होते.**
- याशिवाय वर्मा चार वर्षे म्हाडाच्या दक्षता विभागात कार्यरत होते .
- त्यानंतर पोलीस महासंचालक कार्यालयात काही काळ कार्यरत होते .
- महासंचालक कार्यालयातून वर्मा यांनी **राज्याच्या कायदेशीर आणि तांत्रिक विभागाचे महासंचालक** म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- ते मुळचे उत्तर प्रदेशातील असून त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रातून शिक्षण घेतले.
- एप्रिल 2028 मध्ये ते सेवानिवृत्त होणार आहेत.
- **रश्मी शुक्ला या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक** आहेत. त्या या पदावर जानेवारी 2024 ते नोव्हेंबर 2024 दरम्यान कार्यरत होत्या.

## संजीव खन्ना भारताचे नवे सरन्यायाधीश



- न्यायमूर्ती संजीव खन्ना **यांनी भारताचे 51वे सरन्यायाधीश** म्हणून शपथ घेतली.
- राष्ट्रपती भवनात झालेल्या छोटेखानी समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संजीव खन्ना यांना सरन्यायाधीशपदाची शपथ दिली.
- न्या. खन्ना यांनी ईश्वराचे स्मरण करून **इंग्रजीतून शपथ** घेतली.

- 14 मे 1960 रोजी जन्मलेले खन्ना यांना सरन्यायाधीश म्हणून सहा महिन्यांपेक्षा थोडा अधिक कालावधी मे मिळणार आहे.
- **13 मे 2025 रोजी वयाच्या 65 व्या वर्षी** ते निवृत्त होतील.
- संजीव खन्ना यांनी दिल्ली विद्यापीठात वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर तीस हजारी न्यायालयात वकील म्हणून त्यांनी कारकिर्दीस सुरवात केली.
- 1983 मध्ये ते बार बार कौन्सिल ऑफ दिल्लीचे ते सदस्य बनले.
- न्यायाधीश खन्ना यांचे काका हंसराज खन्ना सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होते.
- संजीव खन्ना यांनी दीर्घकाळ सरकारी वकील म्हणून काम केले आहे.
- या कालावधीत प्राप्तीकर खात्याचे कामही त्यांनी पाहिले.
- **दिल्ली उच्च न्यायालयात त्यांची अतिरिक्त न्यायाधीश** म्हणून 2005मध्ये नियुक्ती झाली. त्याच्या पुढच्याच वर्षी ते कायम न्यायाधीश बनले.
- 18 जानेवारी 2019 रोजी **सर्वोच्च न्यायालयात खन्ना यांची पदोन्नती** झाली.
- तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या नेतृत्वाखालील कॉलेजियमने त्यांची यासाठी शिफारस केली होती.
- **माजी सरन्यायाधीश (50 वे) :** धनंजय चंद्रचूड

## कॉसमॉस बँकेच्या अध्यक्षपदी कोकरे यांची निवड




- पुणे सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य कॉसमॉस बँकेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक ॲड. प्रल्हाद कोकरे यांची निवड करण्यात आली आहे.
- ॲड. कोकरे हे डिसेंबर 2004 पासून बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहेत.
- सन 2019-20 आणि सन 2020-21या वर्षांत त्यांनी बँकेचे उपाध्यक्षपद भूषवले होते.
- ते राज्य सरकारच्या सहकार खात्यातून सहकारी संस्थांचे सहनिबंधक म्हणून निवृत्त झाले आहेत.
- गेल्या 20 वर्षांत संचालकांच्या विविध समित्यांवर ते कार्यरत होते.

- बँकेचे विद्यमान अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांनी स्वेच्छेने राजीनामा दिल्याने ही जागा रिक्त झाली होती.
- गेल्या वीस वर्षांमध्ये ॲड. कोकरे संचालक म्हणून सक्रिय राहिले ठेव आहेत.

## महालेखापरीक्षकपदी मूर्ती यांची नियुक्ती




- देशाचे महालेखापरीक्षक म्हणून केंद्र सरकारने हिमाचल प्रदेश केडरचे आयएएस अधिकारी के. संजय मूर्ती यांची आज नियुक्ती केली.
- ते 15 वे महालेखापरीक्षक असतील.
- त्यांचा कार्यकाळ 2029 पर्यंत असेल.
- भारताचे विद्यमान CAG गिरीश चंद्र मुर्मू यांचा कार्यकाळ 20 नोव्हेंबर रोजी संपत आहे.
- ऑगस्ट 2020 मध्ये मुर्मू यांची CAG म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. याआधी मुर्मू हे जम्मू-काश्मीरचे पहिले लेफ्टनंट गव्हर्नर होते.
- के संजय मूर्ती सध्या शिक्षण मंत्रालयात उच्च शिक्षण विभागाचे सचिव आहेत.
- संजय मूर्ती हे हिमाचल प्रदेश केडरचे 1989 च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत.

**भारताचे नियंत्रक व महालेखापाल**

**(CAG -Comptroller and Auditor General of India)**

- ✓ भारताचे नियंत्रक व महालेखापाल हे भारत सरकारचा जमाखर्च तपासण्याची घटनात्मक अधिकार आसलेले नियंत्रक व महालेखापाल पद आहे.
- ✓ हे पद भारतीय घटनेच्या कलम 148 नुसार निर्माण केले आहे.
- ✓ केंद्र व राज्य सरकारचे जमा आणि खर्चाचे ऑडिट करून रिपोर्ट भारतीय संविधानाने नेमलेल्या पब्लिक अकाऊंट समितींना सादर करण्यात येतो.

*****


THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
UPSC / MPSC
STATE BOARD & NCERT
Foundation Course
'मराठी माध्यम'
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
FREE COURSES AVAILABLE
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
Daily Answer Writing Parctice
तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून Assessment
विषयाच्या Conceptual Clarity वर विशेष भर
Three - Layer 1:1 Personal Mentoring
Join Us!
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834

# 5. दिनविशेष

## 7 नोव्हेंबर : विद्यार्थी दिन




- बी.आर. आंबेडकर यांच्या स्मरणार्थ 7 नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थी दिन साजरा केला जातो.
- **महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने 27 ऑक्टोबर 2017** रोजी संपूर्ण भारतीय राज्यात 7 नोव्हेंबर हा दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.
- शिष्यवृत्ती आणि ज्ञानाचा उच्च दर्जा असूनही आंबेडकरांनी स्वत:ला आजीवन विद्यार्थी मानले. आणि ते एक आदर्श विद्यार्थी बनले म्हणून सरकारने त्यांचा शाळा प्रवेशाचा दिवस विद्यार्थी दिन म्हणून घोषित केला.
- या दिवशी राज्यातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आंबेडकरांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.
- 7 नोव्हेंबर 1900 रोजी, आंबेडकरांनी पहिल्या इयत्तेत महाराष्ट्रातील सातारा येथील राजवाडा चौक येथील शासकीय हायस्कूल (आताचे

प्रताप सिंग हायस्कूल) मध्ये प्रवेश केला . येथे ते 1904 पर्यंत म्हणजेच चौथीपर्यंत शिक्षण घेतले.

## 7 नोव्हेंबर : कर्करोग जागरूकता दिन





- ❖ भारतात दरवर्षी 7 नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिवस साजरा केला जातो.
- ❖ देशातील वाढत्या कर्करोगाच्या प्रमाणाबाबत जागरूकता वाढवणे तसेच प्रतिबंध, लवकर निदान आणि उपचार यासाठीची पावले उचलण्यास प्रेरित करणे या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.
- ❖ हा दिवस अधिकृतपणे साजरा करणारा भारत हा जगातील पहिला देश आहे.
- ❖ किरणोत्सरांचा शोध लावणाऱ्या आणि ज्यांच्या कार्याचा कर्करोगाच्या उपचारांवर सखोल परिणाम झाला आह अशा, नोबेल पारितोषिक विजेत्या मादाम मेरी क्युरी यांचा जन्मदिवस म्हणूनच केवळ ही तारीख निवडली गेली नाही, तर सार्वजनिक आरोग्याला प्राधान्य म्हणून कर्करोगाला संबोधित करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब देखील आहे.
- ❖ मुख्यत्वे जीवनशैलीतील बदल, तंबाखूचा वापर, वाईट आहाराच्या सवयी आणि कमी शारीरिक हालचाल या मुख्य कारणांमुळे 1.4 अब्जाहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे.
- ❖ एका अंदाजानुसार, दरवर्षी सुमारे 800,000 नवीन कर्करोगाची नवी प्रकरणे नोंदविली जातात.
- ❖ तंबाखू-संबंधित कर्करोग रुग्णांपैकी पुरुषांचे प्रमाण 35-50% आणि स्त्रियांचे प्रमाण 17% इतके आहे.तथापि,विविध प्रकारचे कर्करोग प्रतिबंधात्मक उपाय योजून टाळता येण्याजोगे आहेत, तसे25 व्यापक जागरूकता आणि वेळेवर हस्तक्षेप करून, भारत कर्करोगाचा भार लक्षणीयरीत्या कमी करत आहे.

## दक्षता जागरुकता सप्ताह 2024



- दक्षता जागरुकता सप्ताह हा भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्यात केंद्रीय दक्षता आयोगाच्या सहभागी दक्षता उपक्रमांपैकी एक आहे.
- ही एक जागरूकता निर्माण करणे आणि पोहोचण्याचा उपाय आहे ज्याचा उद्देश सर्व भागधारकांना एकत्र आणणे आहे.
- शासन आणि सार्वजनिक प्रशासनात नैतिकता आणि पारदर्शकतेच्या गरजेबद्दल अधिक संवेदनशीलता निर्माण झाल्याचे दिसून येते.
- आयोग सर्व नागरिकांच्या सक्रिय पाठिंब्याने आणि सहभागाने अखंडतेला चालना देण्यासाठी आणि भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न करतो.
- मागील तीन वर्षांपासून, एका आठवड्यापर्यंत एक मोहीम राबविण्यात येत आहे ज्यात प्रतिबंधात्मक दक्षता उपक्रम फोकस क्षेत्रे आहेत.
- दरवर्षी ज्या आठवड्यात भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस येतो त्या आठवड्यात दक्षता जनजागृती सप्ताह पाळला जातो.
- जनजागृती सप्ताह 2024 खालील थीमवर 28 ऑक्टोबर 2024 ते 3 नोव्हेंबर 2024 या कालावधीत साजरा करण्यात आला.
- "सत्यनिष्ठा की संस्कृती से राष्ट्राची समृद्धी" "राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती"

## 11 नोव्हेंबर : राष्ट्रीय शिक्षण दिन




- 11 नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून भारतात साजरा केला जातो.
- भारताचे प्रथम शिक्षण मंत्री अबुल कलाम आझाद यांच्या जयंती निमित्त हा दिवस साजरा केला जातो.
- सप्टेंबर 2008 मध्ये, भारत सरकारने मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या देशाच्या शैक्षणिक व्यवस्थेतील योगदानाचा सन्मान करण्यासाठी 11 नोव्हेंबरला राष्ट्रीय शिक्षण दिन घोषित केला.
- आझाद हे विद्वान, शिक्षणतज्ज्ञ, स्वातंत्र्य योद्धा आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते.
- त्यांचा जन्म 18 नोव्हेंबर 1888 रोजी झाला. त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद सारख्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांची स्थापना केली.

❖ त्यांच्या मार्गदर्शनाखाली, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (CSIR), साहित्य अकादमी, ललित कला अकादमी, संगीत नाटक अकादमी आणि भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (ICCR) यासह अनेक शैक्षणिक आस्थापनांची स्थापना करण्यात आली.

❖ त्यांनी IIT खरगपूर या पहिल्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली.

***राष्ट्रीय शिक्षण दिन 2024: थीम***

- ✓ *सर्वसमावेशक, उच्च-गुणवत्तेचे शिक्षण हा विषय राष्ट्रीय शिक्षण दिन 2024 चा केंद्रबिंदू असेल.*
- ✓ *ही थीम उत्कृष्ट शिक्षणाला प्रोत्साहन देते, जी व्यक्तींना विकसित होत असलेल्या जगात आवश्यक असलेल्या क्षमता आणि माहितीसह सुसज्ज करते.*
- ✓ *शैक्षणिक यशासाठी गंभीर विचार, सर्जनशीलता आणि भावनिक बुद्धिमत्ता विकसित करणे आवश्यक असेल.*

## 13 नोव्हेंबर : जागतिक दयाळूता दिवस




❖ दरवर्षी 13 नोव्हेंबर रोजी जागतिक दया दिवस साजरा केला जातो.

❖ हा दिवस लोकांना समाजातील दयाळूपणा आणि सकारात्मक शक्तीची प्रशंसा करण्यास प्रेरित करतो.

❖ दयाळूपणाला कोणतेही बंधन नसते आणि ते वंश, धर्म, राजकारण आणि लिंग या भावनांच्या पलीकडे जाते.

❖ हा दिवस आम्हाला लोकांसाठी उपयुक्त आणि दयाळू भावनेने पुढे जाण्यास मदत करतो. असे अनेक मार्ग आहेत ज्याद्वारे एखादी व्यक्ती इतर व्यक्तीबद्दल दयाळूपणा दाखवू शकते.

❖ एक त्यांच्या पालकांबद्दल दयाळूपणे वागू शकतो जे तुम्हाला प्रदान करतात किंवा तुमचे शिक्षक जे तुम्हाला एक चांगला माणूस बनवत आहेत.

❖ 1998 मध्ये, जागतिक दयाळू चळवळीने जागतिक दयाळूपणा दिवस सुरू केला. वर्ल्ड काइंडनेस मूव्हमेंट (WKM) चे ध्येय "व्यक्तींना प्रेरणा देणे आणि एक दयाळू जग निर्माण करण्यासाठी राष्ट्रांना जोडणे" आहे.

## 14 नोव्हेंबर - राष्ट्रीय बाल दिन




- मुलांचे हक्क, शिक्षण आणि कल्याण याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी भारतात बालदिन साजरा केला जातो.
- दरवर्षी 14 नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला जातो.
- या दिवशी संपूर्ण भारतभर मुलांसाठी अनेक शैक्षणिक आणि प्रेरक कार्यक्रम आयोजित केले जातात.

***जागतिक बालदिन 2024 ची थीम :***

*या वर्षीच्या जागतिक बालदिनाची थीम "प्रत्येक मुलासाठी, प्रत्येक हक्क" अशी आहे, ज्यामध्ये सर्व मुलांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळतील याची खात्री करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामध्ये शिक्षण, अन्न, निवास, स्वच्छता आणि हानिकारक कामापासून संरक्षण यांचा समावेश होतो.*

## 15 नोव्हेंबर : राष्ट्रीय जनजातीय गौरव दिवस




- भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त 15 नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय जनजातीय गौरव दिवस म्हणून साजरा केला जातो.
- या दिवसाचे उद्दिष्ट भगवान बिरसा मुंडा आणि इतर जनजातीय स्वातंत्र्य सेनान्यांच्या योगदानाला सन्मान देणे आहे.
- या दिवशी जनजातीय समाजाच्या संघर्षांना आठवले जाते आणि त्यांच्या महत्त्वाच्या योगदानाची ओळख केली जाते.

***जनजाती गौरव दिवसाचा इतिहास***

- ✓ *संथाल, तामर, कोल, भिल्ल, खासी आणि मिझोसह विविध आदिवासी समुदायांच्या नेतृत्वाखालील निर्णायक चळवळींमुळे भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याला लक्षणीय बळ मिळाले.*
- ✓ *या आदिवासी समुदायांनी क्रांतिकारी चळवळींमध्ये दाखवलेले धैर्य आणि बलिदान यांनी संपूर्ण देशभरातील भारतीयांना प्रेरणा देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.*

- ✓ *2021 मध्ये, या आदिवासी वीरांनी केलेल्या अमूल्य बलिदानाबद्दल भावी पिढ्यांना प्रबोधन करण्याची गरज ओळखून , सरकारने 15 नोव्हेंबर हा जनजाती गौरव दिवस म्हणून नियुक्त केला.*
- ✓ *ही तारीख श्री बिरसा मुंडा यांच्या जयंतीशी सुसंगत आहे, ज्यांना देशभरातील आदिवासी समुदाय भगवान म्हणून पूज्य करतात.*
- ✓ *बिरसा मुंडा यांनी निर्भयपणे शोषक ब्रिटीश वसाहतवादी व्यवस्थेचा सामना केला, दडपशाहीविरूद्ध चळवळीचे नेतृत्व केले आणि क्रांतीचा पुरस्कार केला.*

**कोण होते बिरसा मुंडा**

- बिरसा मुंडा (15 नोव्हेंबर 1875 - 9 जून 1900) हे भारतातील मुंडा जमातीचे एक आदरणीय आदिवासी नेते आणि लोकनायक होते.
- 19व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश राजवटीत ते एक प्रमुख व्यक्तिमत्व म्हणून उदयास आले, त्यांनी आदिवासी धार्मिक सहस्राब्दी चळवळीचे नेतृत्व केले त्यांचे नेतृत्व आणि ब्रिटीश दडपशाहीविरुद्ध अटळ प्रतिकार यामुळे ते आदिवासी अभिमानाचे प्रतीक आणि अत्याचारित मुंडा समाजासाठी आशेचे किरण बनले.

**मुंडा यांचे नेतृत्व**

- 1894 मध्ये, बिरसा मुंडा हे ब्रिटीश वसाहतवादी राजवटीविरुद्ध मुंडा बंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी उठावाचे नेते म्हणून उदयास आले.
- त्यांनी मुंडा लोकांना त्यांच्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी, त्यांच्या परंपरा जपण्यासाठी आणि ब्रिटीश अधिकाराचा अवमान करण्यास उद्युक्त केले.
- सध्याच्या झारखंडमधील मुंडा पट्ट्यात पसरलेल्या या बंडाला वेग आला.
- बिरसा मुंडा यांचे नेतृत्व आणि करिष्माई व्यक्तिमत्वाने मुंडा लोकांना प्रेरणा दिली, ज्यांनी त्यांना स्वातंत्र्याकडे नेण्यास आणि त्यांचे गमावलेले वैभव पुनर्संचयित करण्यास सक्षम व्यक्तिमत्त्व त्यांच्यामध्ये पाहिले. त्यांचा स्वावलंबन, दडपशाहीचा प्रतिकार आणि पारंपारिक मुंडा मूल्यांचे पालन हा संदेश समाजात खोलवर रुजला.

***जनजाती गौरव दिवसाचे महत्व***

- *हा दिवस भारताच्या संस्कृती, वारसा आणि अर्थव्यवस्थेत आदिवासी समुदायांच्या अतुलनीय योगदानाला ओळखतो.*

- *देशातील जंगले, वन्यजीव आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी आदिवासी समुदायांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी भारताची सांस्कृतिक विविधता त्यांच्या अनोख्या भाषा, चालीरीती आणि परंपरांनी समृद्ध केली आहे.*
- *जनजाती गौरव दिवसाचे उद्दिष्टही आदिवासी समाजाच्या कल्याणाला चालना देण्याचे आहे.*
- *भारत सरकारने आदिवासींचे जीवन सुधारण्यासाठी विविध योजना आणि कार्यक्रम राबवले आहेत जसे की शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगार.*
- *आदिवासी समुदायांसमोरील आव्हाने, जसे की जमीन विस्थापन, दारिद्र्य आणि भेदभाव याबद्दल जागरुकता वाढवण्यासही हा दिवस मदत करतो.*
- *2024 मध्ये बिरसा मुंडा यांची 150 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.*

## भारतीय लष्कराकडून केपांग ला दिन साजरा



- भारतीय लष्कराने अरुणाचल प्रदेशच्या सियांग जिल्ह्यात गेलिंग येथे केपांग दिवस साजरा केला.
- भारतीय लष्कराच्या स्फिअर कोअरने 1962 च्या भारत-चीन युद्धात सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना आदरांजली वाहिली तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याला उजाळा देण्यात आला.
- भारत आणि तिबेट सीमेवरील केपांग ला (खिंड) ही सामरिकदृष्ट्या महत्त्वाची असून 1962 च्या भारत-चीन युद्धात सियांग खोऱ्यात गेलिंग येथील ग्रामस्थांनी भारतीय लष्कराला मदत केली होती.
- या कारणांमुळेच केपांग ला ही भारतीय लष्कर आणि ग्रामस्थांच्या बलिदानाचे प्रतिक आहे.
- दरवर्षी भारतीय लष्कराकडून केपांग ला येथे बलिदान देणाऱ्या जवानांच्या स्मारणार्थ केपांग दिवस साजरा करण्यात येतो.
- चीनच्या युद्धात भारतीय लष्करासमवेत खंबीरपणे उभे राहिलेल्या ग्रामस्थांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिवस साजरा केला जातो आणि याहीवेळी रविवारी (17 नोव्हेंबर.)साजरा करण्यात आला.
- याप्रसंगी ग्रामस्थांच्या शौयगाथेची आठवण करण्यात आली.
- सियांग खोऱ्यातील केपांग खिंड ही भारतीय शौर्याचे प्रतीक आहे. या वेळी लष्कराकडून

मानवंदना देण्यात आली. तसेच लष्कर आणि ग्रामस्थ यांच्या अनोख्या संबंधांचे प्रतीक असलेल्या ऐतिहासिक गेलिंग मठात प्रार्थना म्हणण्यात आली.

**काय घडले होते ?**

- ✓ 1962 मध्ये सियांग खोऱ्यात गावकऱ्यांनी आणि भारतीय लष्करांनी अतुलनीय धाडस दाखविले.
- ✓ गेलिंगच्या ग्रामस्थांनी न्योगोंग नदीजवळ चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीच्या सैनिकांच्या पावलाचे ठसे पाहिले.
- ✓ गावकऱ्यांची सूचना मिळताच भारतीय लष्कर सजग झाले.
- ✓ या वेळी चीनच्या सैनिकांशी झालेल्या धुमश्चक्रीत आठ भारतीय जवानांना वीरमरण आले.
- ✓ यात दोन मद्रास रेजिमेंटचे सुभेदार शेख सुबानी, हवालदार बी. रामलिंगा जी, शिपाई मुरी राजा, अप्पा राव आणि इलियास यांचा समावेश होता.

## 19 नोव्हेंबर : जागतिक शौचालय दिन




- ❖ जागतिक शौचालय दिन हा 19 नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो.
- ❖ जागतिक शौचालय दिन हा जागतिक स्वच्छता संकटाचा सामना करण्यासाठी प्रेरणादायी कृती करण्यासाठी साजरा केला जातो.
- ❖ या दिवसाचा उद्देश शौचालयाची योग्यपद्धतीने स्वच्छता करण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती करणे हा आहे.
- ❖ या दिवशी आजारांपासून बचाव करण्यासाठी आणि स्वच्छतेच्या नियमांना प्रोत्साहन दिले जाते.
- ❖ जागतिक शौचालय संघटनेने 2001 मध्ये या दिवसाची स्थापना केली होती.
- ❖ संयुक्त राष्ट्र महासभेने 2013 मध्ये या दिवसाला अधिकृतपणे जागतिक शौचालय दिन म्हणून नियुक्त केले.
- ❖ दरवर्षी, UN-Water या संयुक्त राष्ट्रांच्या पाणी आणि स्वच्छताविषयक समन्वय यंत्रणेने जागतिक शौचालय दिनाची थीम निश्चित करते.
- ❖ 2024 मध्ये जागतिक शौचालय दिनाची थीम **'शांततेसाठी स्वच्छता'** आहे.

## 20 नोव्हेंबर :जागतिक बाल दिन




- ❖ या दिवसाचा उद्देश जागतिक एकात्मतेला प्रोत्साहन देणे, मुलांच्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवणे आणि त्यांचे संपूर्ण कल्याण सुधारणे हा आहे.
- ❖ जागतिक बालदिन 2024 ची थीम "**आमच्या मुलांमध्ये गुंतवणूक करणे ही आपल्या भविष्यात गुंतवणूक आहे.**"

**इतिहास:**

- ✓ जागतिक बाल दिन साजरा करण्याची सुरुवात 1954 साली झाली.
- ✓ 20 नोव्हेंबर 1954 ला पहिल्यांदा सार्वत्रिकरित्या बाल दिन साजरा करण्यात आला. त्याला सुरुवातीला युनिव्हर्सल चिल्ड्रन्स डे असं संबोधण्यात आलं.
- ✓ त्यानंतर 1959 मध्ये युनायटेड नेशन्स असेंब्लीने बाल हक्कांविषयी चर्चा करण्यासाठी अधिवेशनाचं आयोजन केलं होतं. संयुक्त राष्ट्राच्या अधिवेशनाचा वर्धापन दिन बाल दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**महत्व:**

- जगभरातील मुलांचं कल्याण व्हावं यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न जागतिक बाल दिनाच्या निमित्ताने केला जातो.
- मुलांच्या हक्कांविषयी जागरुकता पसरवणे आणि त्यांच्या विकासासाठी आवश्यक प्रयत्न करणे हा जागतिक बाल दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे.
- अनेक आंतरराष्ट्रीय संघटना मुलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी काम करत आहे.
- युनिसेफदेखील लहान मुलांचा विकास होण्यासाठी अविरतपणे कार्यरत आहे.
- राष्ट्रीय बाल दिन 14 नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो.

## 21 नोव्हेंबर : जागतिक टेलिव्हिजन दिन




- ❖ दरवर्षी 21 नोव्हेंबरला जागतिक टेलिव्हीजन दिवस साजरा केला जातो.

- ❖ या एका आविष्कारामुळे संपूर्ण जगभर भरपूर क्रांती झाली.
- ❖ दृक्श्राव्य माध्यमाच्या यामुळे आपल्याला जगभरात चालू असलेल्या सगळ्या घडामोडी कळतात.
- ❖ टेलिव्हिजन हे जनसंवादाचे असे माध्यम आहे ज्यामुळे आपण मनोरंजन, शिक्षण, चालू घडामोडी, विज्ञान-तंत्रज्ञान इत्यादींशी जोडलेले राहतो. त्यामुळे संपूर्ण जगाची माहित आपल्यापर्यंत काही क्षणातच पोचते.

**वर्ल्ड टेलिव्हिजन दिनाचा इतिहास**

- ✓ नोव्हेंबर 1996 रोजी संयुक्त राष्ट्रांनी पहिले वर्ल्ड टेलिव्हिजन फोरम आयोजित केले होते.
- ✓ यामध्ये माध्यमातील अनेक मान्यवर मडंळीदेखील सहभागी झाले होते.
- ✓ या फोरममध्ये टेलिव्हिजनचे वाढते महत्त्व हा या विषयावर चर्चा करण्यात आली होती.
- ✓ याच दरम्यान 21 नोव्हेंबर हा जागतिक टेलिव्हीजन दिन म्हणून साजरा करण्याचे संयुक्त राष्ट्रांनी घोषित केले.

**टेलिव्हिजनचा इतिहास**

- टेलिव्हिजनचा शोध एक स्कॉटिश इंजीनिअर जॉन लोगी बेयर्ड यांनी लावला होता.
- त्यांनी ज्यावेळी टेलिव्हिजनचा शोध लावला त्यावेळी त्यांचे वय फक्त 21 वर्ष होते.
- जॉन लोगी बेयर्ड यांनी टेलिव्हिजनचा शोध इ.स. 1924 साली लावला. यांनतर, 1927 मध्ये फर्न्सवर्थने पहिला चालू (कार्यरत) टेलिव्हिजन तयार केला होता आणि 1 सप्टेंबर 1928 रोजी याला माध्यमांसमोर सादर करण्यात आले.
- त्यांनतर 1928 साली जॉन लोगी बेयर्ड यांनी रंगीत टेलिव्हिजनचा आविष्कार केला. नंतर तब्बल 10 ते 12 वर्षांनी 1940 मध्ये सार्वजनिक प्रसारणास सुरुवात झाली.


**भारतातील टेलिव्हिजनचा इतिहास**

- टीव्हीचा शोध लागल्यानंतर सुमारे 3 दशकांनी भारतात टीव्ही आला. UNESCO च्या मदतीने 15 सप्टेंबर 1959 रोजी नवी दिल्ली येथे टेलिव्हिजनची सुरुवात झाली.
- भारतात सर्वप्रथम ऑल इंडिया रेडिओच्या अंतर्गत टीव्ही सुरू झाला.
- आकाशवाणी भवनात टीव्हीचे पहिले सभागृह बांधण्यात आले होते. त्याचे उद्घाटन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते झाले.
- भारतात टेलिव्हिजनचे पहिले रंगीत प्रसारण 15 ऑगस्ट 1982 रोजी इंदिरा गांधींच्या भाषणाच्या वेळी झाली. यानंतर नव्वदच्या दशकात रामायण, महाभारत यांसारख्या मालिका सुरू झाल्या.

## 26 नोव्हेंबर : संविधान दिन



- दरवर्षी देशात 26 नोव्हेंबर रोजी सविंधान दिन साजरा केला जातो.
- नागरिकांमध्ये संवैधानिक मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने 19 नोव्हेबर 2015 पासून हा दिवस साजरा करणे सुरू केले. तसेच 26 नोव्हेंबरला देशभरात राष्ट्रीय कायदा दिवसही साजरा केला जातो.





- संवैधानिक आदर्शांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या या प्रयत्नांचा एक भाग म्हणून 'हमारा संविधान, हमारा सन्मान' हे अभियान (Hamara Samvidhan, Hamara Samman campaign) सुरू करण्यात आले आहे. या दिनानिमित्त देशभरातील शाळांमध्ये विविध कार्यक्रम घेतले जातात.
- 26 नोव्हेंबर 1949 ला भारतात सविंधान स्वीकारले गेले होते. यावेळी संविधान सभेने संविधान स्वीकारून 75 वर्षे पूर्ण होत आहेत.

**संविधान दिनाचे महत्त्व**

- संविधान दिन हा दिवस भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतो आणि त्याच्या तत्त्वांवर विचार करण्यासाठी एक विशेष दिवस आहे.
- हा दिवस संविधानाचा सन्मान करण्याचा आणि भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांचा आदर करण्याचा आहे.
- या दिवशी सर्वच शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि इतर संस्था या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.
- यामध्ये संविधानाच्या महत्त्वावर चर्चा केली जाते, शपथ घेतली जाते आणि नागरिकांना संविधानाच्या उद्दिष्टांची जाणीव करून दिली जाते.

*****

THE OFFICER
Your Personal Mentor






# 6. विज्ञान व तंत्रज्ञान

## जपानने अवकाशात सोडला पहिला लाकडी उपग्रह



- ❖ जपानने 'लिग्नोसॅट' हा जगातील पहिला लाकडी उपग्रह अवकाशात सोडला आहे.
- ❖ होनोकी लाकडापासून बनवलेला हा उपग्रह सहा महिने पृथ्वीभोवती फिरणार आहे.
- ❖ भविष्यातील अंतराळ मोहिमांमध्ये लाकडाचा वापर व्यवहार्य ठरू शकतो का, याची चाचणी यातून होणार आहे.
- ❖ लाकडाचा वापर केलेला हा उपग्रह क्योटो विद्यापीठाने विकसित केला आहे.
- ❖ याचे वजन 900 ग्रॅम आहे.
- ❖ 'स्पेसएक्स'च्या मोहिमेतून 'लिंगोसॅट' आंतरराष्ट्रीय अवकाश 'स्थानकाकडे नुकताच पाठविण्यात आला.
- ❖ तेथे पोहोचल्यानंतर 'लिंगोसॅट' हा पृथ्वीच्या कक्षेत स्थापित केला जाईल.
- ❖ अंतराळातील कठीण परिस्थितीत लाकडाच्या टिकाऊपणाची चाचणी तेथे सहा महिने होणार आहे.
- ❖ या उपग्रहाच्या लाकडी चौकट ही मंगोलियन लाकडापासून तयार केली आहे.
- ❖ जपानच्या पारंपरिक पद्धतीनुसार ही चौकट तयार केली असून त्यात स्क्रू आणि गोंद वापरण्यात येत नाही.
- ❖ उपग्रह निर्मितीचा हा अभिनव प्रयोग मानण्यात येत आहे.

❖ अवकाश तंत्रज्ञानात काही निवडक धातूंऐवजी लाकडाचा वापर करणे शक्य होऊ शकते, असा संशोधकांना विश्वास आहे.

## 'सी - प्लेन' ची यशस्वी चाचणी



❖ गुवाहाटीतील एका विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर ब्रह्मपुत्र नदी किनाऱ्यावर पांडू घाट येथे प्रथमच एक 'सी प्लेन' उतरले.

❖ राज्याच्या दळणवळणात सी प्लेनचा समावेश झाल्यामुळे पर्यटनाला चालना मिळणार आहे.

❖ यशस्वी विमान उतरणारे हे पहिलेच सीप्लेन आहे.

❖ दरम्यान जलमार्गावर सी प्लेन व्यवस्था सुरू करण्यास वर्षभराचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

❖ 'आसामच्या पर्यटन आणि अंतर्गत दळणवळण क्षेत्रात नवीन शक्यतांची पहाट' अशा आशयासह • राज्याचे पर्यटनमंत्री जयंत मल्ला बरुआ यांनी समाजमाध्यमावर मत व्यक्त केले.

## अणुऊर्जा प्रकल्प पूर्ण करणारा संयुक्त अरब अमिराती पहिला अरब देश



❖ अबुधाबीतील बाराका अणुऊर्जा प्रकल्प हा अरब जगातील पहिला पूर्णपणे कार्यान्वित अणुऊर्जा प्रकल्प ठरला आहे.

❖ प्रकल्पाच्या चौथ्या अणुभट्टीने व्यावसायिक कामकाज सुरू केले आहे.

❖ वार्षिक 40 टेरावॅट-तास ची एकूण उत्पादन क्षमता असणारा हा प्रकल्प युएईच्या विजेच्या मागणीच्या 25% पूर्ण करणार आहे.

❖ बाराका प्रकल्पातून अबू धाबी नॅशनल ऑइल कंपनी, एमिरेट्स स्टील आणि एमिरेट्स ग्लोबल ॲल्युमिनियमसह प्रमुख उद्योगांना वीज मिळेल.

## जड पाण्याच्या पुरवठ्यासाठी करार



❖ अणु उर्जा विभागाच्या हेवी वॉटर बोर्ड (एचडब्ल्यूबी) ने न्यूक्लिओइलेक्ट्रिका अर्जेंटिना

एस.ए (नासा) समवेत जड पाण्याच्या पुरवठ्यासाठी करार केला आहे.

- हे पाणी अर्जेंटिनामधील नासा द्वारे संचालित प्रेशराईज्ड हेवी वॉटर रिएक्टर्स (पीएचडब्ल्यूआर) यासाठी वापरण्यात येईल.
- चार वर्षांच्या कालावधीचा हा करार 4 नोव्हेंबर 2024 रोजी झाला.

## इस्रो-ऑस्ट्रेलियाच्या अंतराळ संस्थेत करार

- अंतराळ कार्यक्रम सहकार्य मजबूत करण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि ऑस्ट्रेलियन स्पेस एजन्सी (एएसए) यांच्यात अंमलबजावणी करारावर स्वाक्षरी करण्यात आली.
- या करारानुसार गगनयान मोहिमेसाठी दोनही अंतराळ संस्थेमध्ये सहकार्य होणार आहे.
- 20 नोव्हेंबर रोजी बंगळूरु येथे इस्रोच्या वतीने ह्यूमन स्पेस फ्लाइट सेंटरचे संचालक डी. के. सिंग आणि कॅनबेरा येथील एएसएच्या वतीने महाव्यवस्थापक जारोड पॉवेल यांनी करारावर स्वाक्षरी केली.

## भारताच्या दूरसंचार उपग्रहाचे अमेरिकेतून यशस्वी प्रक्षेपण




- देशाचा नवा 'जीसॅट-एन 2' हा दूरसंचार उपग्रह अमेरिकेतील केप कनाव्हरल येथून 'स्पेस-एक्स'च्या सहाय्याने अवकाशात प्रक्षेपण करण्यात आले.
- 'इस्रो'च्या 'न्यूस्पेस इंडिया लिमिटेड' अर्थात 'एनएसआयएल' ने ही माहिती दिली.
- दूरसंचार उपग्रहामुळे ब्रॉडबँड सेवा अधिक चांगली होणार असून, भारताच्या कुठल्याही हवाई भागात विमानामध्येही इंटरनेटचा वापर करता येणार आहे.
- एखादा उपग्रह अवकाशात सोडण्यासाठीची यंत्रणा 'इस्रो'कडे होती. मात्र, 'जीसॅट-एन 2' उपग्रह वजनाने जास्त होता आणि इस्रोकडे या वजनाचा उपग्रह अवकाशात सोडण्याची सुविधा नव्हती त्यामुळे परदेशातून उपग्रहाला अवकाशात सोडावे लागल्याची माहिती शास्त्रज्ञांनी दिली.

- इस्रोचे माजी अध्यक्ष के सीवन यांनीही अधिक वजनामुळे परदेशातून उपग्रह अवकाशात सोडावा लागल्याची माहिती दिली.
- उपग्रहाचे वजन 4700 किलो आहे.
- इस्रो कडून अनेक यशस्वी मोहिमा पार पडल्यानंतर भारताचा जीसॅट एन 2 या महत्त्वकांक्षी दूरसंचार उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यासाठी अमेरिकेतील स्पेसेक्स ची मदत घेण्यात आली आहे.

**उपग्रहाची वैशिष्ट्ये**

- ✓ इंटरनेटचा मोठा खरेदीदार वर्गाला उपयुक्त ठरेल, असे उपग्रहात तंत्रज्ञान, अनेक 'स्पॉट बीम्स' आणि केए 7 केए ट्रान्सपॉडर्स
- ✓ उपग्रहाचे कार्य 14 वर्षांचे असून, त्यात 32 'यूझर बीम'चा समावेश आहे.
- ✓ ईशान्य भारतासाठी 8 छोटे 'स्पॉट बीम्स' आणि उर्वरित भारतासाठी 24मोठे 'स्पॉट बीम्स' असतील.
- ✓ भारतातील विविध ठिकाणी असलेल्या हब स्टेशन्समधून 32 'बीम्स'ना उपयुक्त ठरेल असे सहाय्य केले जाणार.

**मागणीवर आधारित दुसरा उपग्रह**



- या उपग्रहामुळे भारताच्या सर्व भागात ब्रॉडबँड सेवा अधिक चांगली होणार आहे आणि विमानातही इंटरनेटला चांगली रेंज येऊ शकेल.
- 'एनएसआयएल'चा 'जीसॅट-24' हा पहिला मागणीवर आधारित अर्थात 'डिमांड ड्रिव्हन' उपग्रह होता.
- हा उपग्रह फ्रेंच गयानातील कौरौ येथून 23 जून 2022 रोजी सोडण्यात आला.

*****


THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
UPSC / MPSC
निबंधलेखन
LIVE + Recorded Batch
ADMISSION STARTED
त्वरा करा
प्रवेश मर्यादित
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
FREE COURSES AVAILABLE
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
1:1 Perspnal Mentoring
25 नमुना निबंधांचे मुद्देसुद मसुदे
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
Virtual Library ची सुविधा
अमर्याद Watch Time
Printed Notes available
Course Validity - 6 months
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834



# 7. निधन

## 'बीपीएल' चे संस्थापक नम्बियार यांचे निधन



- ब्रिटिश फिजिकल लॅबोरेटरीज (बीपीएल) समूहाचे संस्थापक टी. पी. गोपालन नम्बियार यांचे वयाच्या 94 व्या वर्षी निधन झाले.
- इलेक्ट्रॉनिक्स उद्योगविश्वात नम्बियार हे 'टीपीजी' या टोपणनावाने ओळखले जात.
- त्यांनी 1963 मध्ये बीपीएल समूहाची स्थापना केली.
- भाजप नेते आणि माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांचे नम्बियार हे सासरे आहेत.
- बीपीएल समूह वैद्यकीय यंत्रे, टेलिव्हिजन संयंत्रे, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह ओव्हन, ऑडिओ उपकरणे आणि वातानुकूलन यंत्रे यांचे उत्पादन करतो.
- या समूहाचे एकूण उत्पन्न 118.50कोटी रुपये आहे.

## अर्थशास्त्रज्ञ विवेक देबरॉय यांचे निधन



- प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष विवेक देबरॉय यांचे वयाच्या 69 व्या वर्षी निधन झाले.
- देबरॉय सप्टेंबर 2017 पासून **पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष** होते.

- **2015** मध्ये त्यांना **पद्मश्री** ने सन्मानित करण्यात आला होते.
- अनेक वृत्तपत्रात त्यांनी लेखन केले.
- 'रामकृष्ण मिशन स्कूल' मध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.
- कोलकाता प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये महाविद्यालयीन शिक्षण झाले. त्यानंतर दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि केंब्रिज येथील त्रिनिटी कॉलेजमधून त्यांनी अर्थशास्त्रात प्रावीण्य मिळविले.
- देबरॉय यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेज, पुण्यातील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, दिल्लीतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड येथे काम केले आहे. तसेच, **अर्थ मंत्रालयातील कायदेविषयक सुधारणा प्रकल्पाचे संचालक** म्हणूनही त्यांनी काम केले.
- ते **नीती आयोगाचे 2015 ते 2019 या काळात पूर्ण वेळ सदस्य** होते.

## बिहारच्या गान कोकिळा शारदा सिन्हा यांचे निधन



- बिहारच्या गानकोकिळा शारदा सिन्हा यांचे वयाच्या 72 व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले.
- त्यांनी भोजपुरी आणि मैथिली लोकगीतातून लोकप्रियता मिळवली.
- गेल्या पाच दशकांपासून शारदा सिन्हा यांनी उत्तर भारतीय संगीत क्षेत्रात योगदान दिले आणि त्याबद्दल त्यांना पद्मश्री (1991) पद्मभूषण (2018), लोकगीतासाठीचा संगीत नाटक अकादमी (2000) यासह विविध पुरस्काराने गौरविण्यात आले तसेच त्यांना बिहार सरकारने देखील सन्मानित केले होते गायनाबरोबरच त्या विविध संस्कृती कार्यक्रमातही सक्रिय सहभागी होत्या.

## पंडित राम नारायण यांचे निधन



- प्रख्यात सारंगीवादक पंडित रामनारायण यांचे वयाच्या 96 वर्षी निधन झाले.
- सारंगीला लोकसंगीतामधून शास्त्रीय संगीतामध्ये मानाचे स्थान देणारा कलाकार म्हणून राम नारायण ओळखले जातात .
- त्यांना **2005 यावर्षी पद्मविभूषण** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.
- सारंगीवर अतिशय कुशलतेने खयाल सादर करणारे पंडित नारायण यांनी **मुघले आजम पाकीजा** आणि **काश्मीर की कली** यासारख्या चित्रपटांच्या संगीतालाही सारंगीचा साज चढावला होता.
- पंडित राम नारायण यांचा जन्म राजस्थानमधील उदयपूर जवळच्या आमेर गावी 25 डिसेंबर 1927 रोजी झाला.
- त्यांचे वडीलही गायक होते.
- त्यांचे आजोबा आणि पणजोबा उदयपूरच्या महाराणांच्या दरबारातील गायक होते.
- आपल्या वडिलांच्या प्रोत्साहनाने उदयपूरचे सारंगी वादक उदय लाल यांच्याकडे त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षापासून सारंगीचे धडे गिरवायला सुरुवात केली. लखनौचे गायक माधव प्रसाद यांनी त्यांना ख्याल अंगाची दीक्षा दिली.

## बार्बरा टेलर ब्रेडफोर्ड यांचे निधन



- चाळीसच्या दशकात 'अ वुमन ऑफ सबस्टन्स' या पराक्रम गाथेद्वारे प्रसिद्ध झालेल्या तसेच लाखो प्रती विकल्या गेलेल्या डझनभराहून अधिक कादंबऱ्यांच्या लेखिका तथा ब्रिटिश पत्रकार बार्बरा टेलर ब्रेडफोर्ड यांचे वयाच्या 91 व्या वर्षी निधन झाले.
- 1979 मध्ये प्रकाशित झालेल्या 'अ वुमन ऑफ सबस्टन्स' पासून सुरुवात करून ब्रेडफोर्ड या जगातील सर्वांत लोकप्रिय आणि श्रीमंत

लेखिका बनल्या. वर्षभरात सरासरी एक पुस्तक त्यांनी लिहिले.

- 1999 मध्ये एका टपाल तिकिटावर त्यांचे छायाचित्र प्रसिद्ध झाले आहे.
- 2007 मध्ये राणी एलिझाबेथ द्वितीय यांनी त्यांना 'ओबी' पुरस्काराने सन्मानित केले.
- त्यांची पुस्तके 40 भाषांमध्ये प्रकाशित झाली असून, जगभरात 90 दशलक्षांहून अधिक प्रती विकल्या गेल्या.

## एस्सार समूहाचे सह-संस्थापक शशी रुईया यांचे निधन



- पहिल्या पिढीचे उद्योजक आणि छोटेखानी बांधकाम व्यवसायाला पायाभूत सुविधा क्षेत्रातील एस्सार समूहात रूपांतरित करणारे शशिकांत रुईया यांचे दीर्घ आजाराने वयाच्या 80 व्या वर्षी मुंबईत निधन झाले.
- वडील नंदकिशोर रुईया यांच्या मार्गदर्शनाखाली कारकीर्दीची सुरुवात करून, शशी आणि त्यांचा भाऊ रवी यांनी 1969 मध्ये एस्सारची पायाभरणी केली.


*****


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
ONLINE + OFFLINE BATCH
सामान्य अध्ययन पेपर IV
नीतिशास्त्र
ACHIEVE ETHICS EXCELLENCE IN LESS THAN
45 Days!
मराठी बॅच- सकाळी 8:30 ते 10:30
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
स्थळ: गणेश कड अकॅडमी, श्रीनिधी बिल्डिंग, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी गेट, कॉसमॉस बँक शेजारी, टिळक रोड, पुणे- ३०
DOWNLOAD OUR FREE APP
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834



# 8. कृषी व पर्यावरण

## काँग-रे चक्रीवादळ




shutterstock.com · 2068736477

- तैवानमध्ये काँग-रे चक्रीवादळ शक्तिशाली वादळामुळे शाळा आणि कार्यालये बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.
- या वादळामुळे पूर्व किनारपट्टीवर जोरदार वारे आणि पूर आला असून देशाच्या उत्तरेकडील विमान उड्डाणे आणि रेल्वेसेवा स्थगित करण्यात आली आहे.
- जवळपास 8600 लोकांना निवारा केंद्रांमध्ये हलवण्यात आले आहे. हे वादळ ताइतुंगच्या पूर्वेकडे काउंटीमधून पुढे सरकले असताना त्याचा वेग ताशी 184 किमी इतका होता.तर 227 किमी प्रतितास वेगाने हे वारे वाहत होते.

## पुण्यात कोळ्याच्या नवीन प्रजातीचा शोध



- उडी मारणाऱ्या कोळ्याच्या 'ओकिनाविसियस टेकडी' या नवीन प्रजातीचा शोध पुण्यातील बाणेर टेकडीवर लागला आहे.

- या कोळ्याचा शोध टेकडीवर लागल्यामुळे कोळ्याच्या नावात टेकडी हा शब्द टाकण्यात आल्याचे संशोधकांनी सांगितले.
- या संशोधनाने पुण्याच्या जैवविविधतेच्या संपत्तीला नव्याने अधोरेखित केले आहे.
- विज्ञान आणि संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा शोध हा'एमआयटी-डब्ल्यूपीयू'च्या संशोधकांनी लावला आहे.
- या शोधात 'एमआयटी-डब्ल्यूपीयू' येथील - पर्यावरणशास्त्रातील एमएस्सीचा इ - विद्यार्थी अथर्व कुलकर्णी आणि क केरळमधील ख्राइस्ट कॉलेजचा ऋषिकेश त्रिपाठी यांनी प्रमुख भूमिका बजावली आहे.
- बाणेर हिलवरील 'फायकस' आणि 'प्लुमेरिया' या झाडांवर कोळ्याचा अभ्यास केला. काही महिन्यांनंतर त्याला नवीन प्रजाती म्हणून मान्यता दिली.

## जागतिक हवामान बदल परिषद (COP29)- 2024

COP29
Baku
Azerbaijan

- हवामान बदलामुळे जगभरात निर्माण झालेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी अजरबैजानची राजधानी बाकूमध्ये संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेला (COP -29) सुरवात झाली.
- 11 नोव्हेंबर ते 22 नोव्हेंबर पर्यंत ही परिषद चालणार आहे. दरवर्षी ही परिषद होत असते
- हवामान बदलाविरोधातील उपाय योजताना, नव्या वित्तीय उद्दिष्टांवर विकसित व विकसनशील देशांमधील मतभेद पहिल्याच दिवशी समोर आले.
- हवामान बदलाचा सामना करताना पुढील बारा वर्षांसाठीच्या विकसित आणि विकसनशील देशांमधील मतभेदांवर तोडगा काढण्याचे आव्हान या परिषदेमध्ये आहे.

**परिषदेविषयी**

- ✓ हवामान बदलाबद्दल निर्णय घेणारी ही परिषद जगातील सर्व देशांची आणि बहुस्तरीय अशी एकमेव परिषद आहे.
- ✓ जागतिक तापमानवाढ 1.5 अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवणे, सन 2050पर्यंत शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठणे आदी प्रयत्नांवर परिषद काम करीत आहे.

- ✓ 'यूएनएफसीसीसी'मध्ये 198 देशांचा समावेश आहे. मात्र, या करारांतर्गत 2015मध्ये झालेल्या पॅरिस कराराला इराण, लीबिया आणि येमेन या देशांनी मान्यता दिली नव्हती.
- ✓ सन 2020 मध्ये अमेरिका पॅरिस करारातून बाहेर पडली आणि 2021मध्ये पुन्हा सहभागी झाली.

***परिषदेची उद्दिष्टे***

- *हवामान बदलाशी लढण्यासाठीच्या वित्तपुरवठ्याचे नवे लक्ष्य ठरवण्याला 2024 च्या परिषदेत प्राधान्य असेल.*
- *प्रत्येक देशाने हवामान बदलांबाबत ठोस कृती करावी यासाठीही पाठपुरावा केला जाईल.*
- *हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे आणि अनुकूल समुदायांची उभारणी करण्याचेही उद्दिष्ट.*
- *राष्ट्रीय हवामान आराखड्यांच्या पुढच्या फेरीवरही लक्ष केंद्रित केले जाणार आहे.*
- *पारंपरिक इंधनाच्या वापरापासून देशांनी दूर जावे यासाठीच्या धोरणांच्या अंमलबजावणीवर भर.*

**तालिबान प्रथमच सहभागी होणार**

- अफगाणिस्तानमध्ये 2021मध्ये सत्ता ताब्यात घेतल्यानंतर तालिबान या वर्षी प्रथमच संयुक्त राष्ट्र हवामान परिषदेत सहभागी होणार आहे.
- तालिबानच्या वतीने तांत्रिक शिष्टमंडळ या परिषदेत सहभागी होण्यासाठी बाकू येथे जाणार आहे.
- पर्यावरण संरक्षण आणि हवामान बदल या विषयांवर आंतरराष्ट्रीय समुदायाशी संबंध वाढवण्यासाठी या मंचाचा वापर केला जाईल, असे तालिबानच्या प्रशासनाने म्हटले आहे.

***COP 29 विषयी***

- *'यूएन फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज' (यूएनएफसीसीसी) हा ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय करार सन 1992मध्ये करण्यात आला होता.*
- *यातूनच पुढे सन 2015 मध्ये झालेल्या पॅरिस हवामान करार झाला.*
- *'यूएनएफसीसीसी' अंतर्गत 'कॉन्फरन्स ऑफ द पार्टीज' (सीओपी) ही परिषद होते.*
- *2024 ची परिषद 29 वी आहे. त्यामुळे तिला 'COP29' म्हटले जाते.*

**भारताची भूमिका**

- हवामान बदलाशी संबंधित वित्त पुरवठ्याबद्दल विकसित देशांची जबाबदारी निश्चित करावी आणि ऊर्जा स्त्रोतांच्या परिवर्तनाचे उद्दिष्ट समान पद्धतीने साधावे यावर भारताचा भर असणार आहे.

- विकसित देशांनी निधीत वाढ करावी ही भारताची मागणी आहे .
- कोपनहेगन येथे झालेल्या cop 15 मध्ये विकसित देशांनी दरवर्षी 100 अब्ज डॉलर विकसनशील देशांना हवामान बदलाशी लढण्यासाठी 2020 पर्यंत द्यावेत असे ठरले होते .
- मात्र हवामानाशी संबंधित निधी कसा ठरवायचा याबाबत स्पष्टता नाही.
- जागतिक हवामान बदलाची पहिली परिषद 1995 मध्ये जर्मनीतील बर्लिन या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

**शांघाय सर्वाधिक प्रदूषित शहर**



❖ अमेरिका आणि आशियातील शहरांमधून सर्वाधिक हरितगृह वायूंचे उत्सर्जन होते. त्यातून तापमान वाढीमध्ये भर पडते. यामध्ये शांघाय सर्वाधिक प्रदूषित शहर आहे, अशी माहिती एका अहवालामध्ये समोर आली आहे. अन्य शहरांमध्ये न्यूयॉर्क, टोकियो, ह्यूस्टन या शहरांचाही समावेश आहे.

❖ अझरबैजान येथे भरलेल्या जागतिक हवामान परिषदेत (कॉप 29) एक अहवाल सादर करण्यात आला. यामध्ये ही माहिती समोर आली आहे.

❖ सर्वाधिक हरितगृह वायूंचे उत्सर्जन करणाऱ्या प्रांतांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये एक अब्ज टनांपेक्षा जास्त हरितगृह वायूचे उत्सर्जन करणाऱ्या प्रांतांमध्ये सातपैकी सहा प्रांत चीनमधील आहेत.

❖ यामध्ये उपग्रहांतून मिळणारी निरीक्षणे आणि अन्य माहितीच्या आधारावर ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

❖ कार्बनडाय ऑक्साइड आणि मिथेनमुळे होणारे प्रदूषण 0.7 टक्क्यांनी वाढले आहे, असेही यात नमूद केले आहे.

❖ सन 2022 ते 2023 या काळामध्ये चीन, भारत, इंडोनेशिया आणि रशिया या देशांमध्ये सर्वाधिक हरितगृह वायूंचे प्रदूषण झाले आहे.

❖ तर व्हेनेझुएला, जपान, जर्मनी, ब्रिटन आणि अमेरिकेतील प्रदूषणामध्ये मोठी घट झाल्याचे या अहवालातून नमूद करण्यात आले आहे.

## भारतातील 56 व्या व्याघ्र प्रकल्पाची घोषणा



देशातील 56 वा व्याघ्र प्रकल्प म्हणून छत्तीसगडमधील गुरु घासीदास-तमोर-पिंगळा व्याघ्र प्रकल्पासाठी अधिसूचना नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### भारतातील तिसरा सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प

- अधिसूचनेनुसार, गुरु घासीदास- तमोर पिंगळा व्याघ्र प्रकल्प 2829.387 चौरस किमी क्षेत्रफळावर पसरला जाईल, ज्यात 2049.232 चौरस किमी कोर क्षेत्राचा समावेश आहे, कोरिया, सूरजपूर, बलरामपूर आणि मनेंद्रगड-चिरमिरी-भरतपूर जिल्ह्यांमध्ये.
- गुरु घासीदास- तमोर पिंगळा व्याघ्र प्रकल्प हे देशातील तिसरे मोठे व्याघ्र प्रकल्प असेल.
- नागार्जुनसागर श्रीशैलम वाघ आंध्र प्रदेशातील राखीव क्षेत्र हे देशातील सर्वात मोठे व्याघ्र प्रकल्प आहे( 3296.31 चौ.कि.मी. )त्यानंतर आसामच्या मानस व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र (2837.1) चौ.कि.मी.
- भारतातील 55 वा व्याघ्र प्रकल्प राजस्थानमधील धोलपूर - कैरोली व्याघ्र प्रकल्प आहे.
- भारतात व्याघ्र प्रकल्प 1973 पासून सुरू झाले आहे.
- भारताचे पर्यावरण मंत्री हे भूपेंद्र यादव आहेत

## 'अगस्त्यमलाई नीलपरी'चा शोध



- केरळमधील पप्पारा वन्यजीव अभयारण्याजवळील (जि. तिरुअनंतपुरम) मंजादिनिनविला भागात 'टाचणी' या कीटकाच्या प्रवर्गातील 'अगस्त्यमलाई बांबूटेल' (अगस्त्यमलाई नीलपरी) या नव्या प्रजातीचा शोध लागला आहे.
- एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्र्व्हसिटीतील संशोधकांसह अन्य संशोधकांनी केरळच्या पश्चिम घाटात हा शोध लावला आहे.
- या प्रजातीचे शास्त्रीय नाव 'मेलानोन्यूरा अगस्त्यमलाइका' असे आहे.
- परंतु पश्चिम घाटातील अगस्त्यमलाई प्रदेशाच्या सन्मानार्थ आणि याच भागात आढळल्याने नव्या प्रजातीच्या 'टाचणी'ला 'अगस्त्यमलाई बांबूटेल' हे नाव देण्यात आले.
- 'अगस्त्यमलाई बांबूटेल' आणि प्रकरु याच वंशातील माहीत असलेली एकमेव प्रजाती

म्हणजे कुर्ग-वायनाड भागात आढळणारी 'मालाबार बांबूटेल' (मेलानोन्यूरा बिलिनेटा) प्रजाती या दोन्हींमध्ये अतिशय साधर्म्य आहे.

- ❖ बांबूच्या काडीसारख्या लांब आणि सिलिंडर आकाराचे पोट यावरून या प्रकारातील टाचणीला 'बांबूटेल' म्हटले जाते.
- ❖ याआधी मालाबार बांबूटेल ही प्रजाती माहीत होती. परंतु जवळपास शंभर वर्षांनंतर आता याच वंशातील दुसऱ्या प्रजातीचा शोध लागला आहे.

**नव्या प्रजातीची वैशिष्ट्ये**

- ✓ नवीन प्रजाती दिसायला आकर्षक असून यातील आणि मालाबार बांबूटेलमधील आनुवंशिक फरकही महत्त्वाचा आहे.
- ✓ दोन्ही प्रजातींमध्ये माइटोकॉन्ड्रियल ऑक्सिडेज-वन साइटोक्रोम जीनमध्ये सात -टक्क्यांपेक्षा अधिक आनुवंशिक फरक आढळला.
- ✓ अगस्त्यमलाई बांबूटेलचा शरीर लांब आणि काळ्या रंगाचा असून त्यावर चमकदार निळे चिन्ह दिसते.
- ✓ ही नवी प्रजाती करमना नदीत जाणाऱ्या प्रवाहांमध्ये आढळली.
- ✓ हा परिसर राखीव वन क्षेत्राच्या बाहेरच्या परिसंस्थेचा भाग आहे.

## 'इंडसइंड' बँकेचा कृषी मंत्रालयाशी करार




- ❖ इंडसइंड बँक आणि भारत फायनान्शियल इन्क्लुजन लि. या आयबीएलच्या उपकंपनीने भारत संजीवनी कृषी उत्थान उपक्रम राबवण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाशी सामंजस्य करार केला आहे.
- ❖ देशातील दहा हजार शेतकरी उत्पादक संस्थांची (एफपीओ) निर्मिती आणि प्रोत्साहन, या सरकारच्या प्रमुख कार्यक्रमाला समर्थन देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.
- ❖ शेतकरी उत्पादक संस्था शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेचा लाभ घेण्यास, उत्पादन खर्च कमी करण्यास आणि त्यांच्या कृषी उत्पादनांच्या एकत्रीकरणाद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास सक्षम करतात.
- ❖ या माध्यमातून या संस्था शाश्वत उत्पन्नासाठी महत्वाची भूमिका बजावतात.

## फेंगल चक्रीवादळ




- बंगालच्या उपसागरातील अतितीव्र कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता आणखी वाढून 'फेंगल' चक्रीवादळ तयार झाल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) जाहीर केले.
- हे चक्रीवादळ 30 नोव्हेंबर रोजी तमिळनाडू आणि पुदुच्चेरीची किनारपट्टी ओलांडणार असल्याचा अंदाज 'आयएमडी' ने वर्तवला
- विषुववृत्तीय हिंदी महासागर आणि लगतच्या दक्षिण बंगालच्या उपसागरामध्ये 23 नोव्हेंबरला कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले होते. त्याची तीव्रता 25 नोव्हेंबरला डिप्रेशनपर्यंत वाढली.
- श्रीलंकेच्या पूर्व किनारपट्टीला समांतर वायव्येकडे संथपणे सरकणाऱ्या या क्षेत्रामुळे गेल्या चार दिवसांत श्रीलंका आणि तमिळनाडूमध्ये अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली.

### फेंगल

- फेंगल या शब्दाचा अर्थ आहे उदासीन, हा अरेबिक भाषेतला शब्द आहे.
- चक्रीवादळाचे नाव ‘फेंगल’ सौदी अरेबियाने प्रस्तावित केले होते आणि त्याचे मूळ अरबी भाषेतून घेतले आहे.
- हे नाव भाषिक वारसा आणि सांस्कृतिक ओळख यांच्या मिश्रणाचे प्रतीक आहे, जागतिक हवामान संघटना (WMO) आणि युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक अँड सोशल कमिशन फॉर आशिया अँड द पॅसिफिक (UNESCAP) नामकरण पॅनेलमधील प्रादेशिक विविधतेवर जोर देतं.

## मुंबईत पहिले प्लास्टिक पुनर्वापर प्रदर्शन



- देशातील पहिले वहिले प्लॅस्टिक रिसायकलिंग - तंत्रज्ञान प्रदर्शन; तसेच पर्यावरणपूरक पॉलिथिन आणि फोम प्रदर्शन (प्लॅस्टिक - रिसायकलिंग शो) मुंबईतील गोरेगावच्या बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 4 ते 6 - डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात - आले आहे.

- सध्या देशातील पुनर्वापर केलेल्या प्लॅस्टिकची बाजारपेठ एक कोटी टनांची - आहे. ती 2032 मध्ये सव्वादोन कोटी - टनांपर्यंत जाईल, असा अंदाज आहे.
- देशात दरवर्षी जेमतेम दीड लाख टन प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याची क्षमता असून, त्यात वाढीची मोठी संधी आहे, त्यासाठी या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक उपायोजना याची माहिती या प्रदर्शनात मिळेल.
- मीडिया फ्युजन व क्रेन कम्युनिकेशन तर्फे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

*****

THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR


UPSC
MPSC
THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
Stanford Seed
वैकल्पिक विषय
समाजशास्त्र
विषयाचे महाराष्ट्राचे एकमेव तज्ञ मार्गदर्शक
FREE SEMINAR
21 NOV 2024, 5PM
BATCH START
21 NOV 2024
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
Offline Seminar Address
The Officer Your Personal Mentor, 1st floor, Palak Heights, Above Hotel Appa, Near LIC Building (Z bridge side), Alka Chowk, Narayan Peth, Pune - 30
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
Main Course - By Covering all Micro Topics Of Syllabus
Assignments - 650+ प्रश्नांचा उत्तर लेखन सराव
1:1 Personal Mentoring
अमर्याद Watch Time
Target Oriented Monthly & Weekly Schedule
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
अधिकारी वर्गाशी संवाद
Regular Evaluation & Critical Feedback By Amol Sir
9665666195 / 9665288834
Google Meet
LIVE ON
ACHIEVE SOCIOLOGY EXCELLENCE IN LESS THAN
90 Days!
DOWNLOAD OUR FREE APP




# 9. सामाजिक व शैक्षणिक

## अमेरिकेत सर्वाधिक भारतीय विद्यार्थ्यांची नोंद



- अमेरिकेत सर्वाधिक विदेशी विद्यार्थी पाठवणारा देश म्हणून भारत गेल्या 15 वर्षांत प्रथमच समोर आला आहे.
- अमेरिकेच्या शिक्षण संस्थांमध्ये सध्या 3.3 लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थी शिकत आहेत.
- प्रसिद्ध झालेल्या 'ओपन डोअर्स अहवाल 2024'द्वारे ही माहिती अधोरेखित करण्यात आली.

**दोन वर्षांची तुलना**

- ✓ शैक्षणिक वर्ष 2022-23मध्ये अमेरिकेत विदेशी विद्यार्थी पाठवण्यात चीन पहिल्या क्रमांकावर होता, तर भारत दुसऱ्या स्थानी.
- ✓ सध्याच्या 'ओपन डोअर्स अहवाला' नुसार शैक्षणिक वर्ष 2023-24मध्ये अमेरिकेत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने उच्चांकी म्हणजे 3 लाख 31 हजार 602 राहिली.
- ✓ वर्ष 2022 - 23 च्या तुलनेत यात 23 टक्क्यांनी वाढ.
- ✓ या वर्षात ही संख्या 2 लाख 68 हजार 923 इतकी होती.

**अहवालातील ठळक घडामोडी**

- ✓ भारत आता अमेरिकेत सर्वाधिक विदेशी विद्यार्थी पाठवणारा देश
- ✓ अमेरिकेत शिकणाऱ्या एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी 29 टक्के विद्यार्थी भारतातील
- ✓ शैक्षणिक वर्ष 2023- 24 मध्ये अमेरिकेत सर्वाधिक आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पाठवणाऱ्या पहिल्या पाच देशांमध्ये भारताशिवाय, चीन, दक्षिण कोरिया, कॅनडा आणि तैवानचा समावेश.
- ✓ भारत सलग दुसऱ्या वर्षी अमेरिकेत सर्वाधिक विदेशी पदवीधर पाठविणारा देशही ठरला.

**अहवालाचा हेतू**

- हा अहवाल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन ने प्रसिद्ध केला असून अमेरिकेतील विदेशी विद्यार्थ्यांचे वार्षिक सर्वेक्षण करते.
- आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि शैक्षणिक आदान प्रदानाच्या फायद्यावर प्रकाश टाकण्याचा या संस्थेचा उद्देश आहे.

**'बालविवाहमुक्त भारत' मोहिमेला सुरुवात**




- ❖ एकीकडे भारत प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करीत असताना, दुसरीकडे आपण अजूनही अनेक अनिष्ट रूढी-परंपरांची पाळे-मुळे उखडून टाकण्यात अपयशी ठरल्याचे बालविवाहाच्या समस्येवरून अधोरेखित होते.
- ❖ देशात अजूनही पाचपैकी एका मुलीचा बालविवाह होत असल्याची माहिती केंद्रीय महिला व बालविकासमंत्री अन्नपूर्णा देवी यांनी दिली.

**मोहिमेचे उद्दिष्ट:**

- 'बालविवाहमुक्त भारत' या मोहिमेचा केंद्र सरकारकडून प्रारंभ
- 2029 पर्यंत बालविवाहाचा दर पाच टक्क्यांहून कमी करण्याचे उद्दिष्ट
- राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना विशेष कृती योजना तयार करण्याचे आवाहन

**मोहिमेची रूपरेषा:**

- 'बालविवाहमुक्त भारत' पोर्टल सुरू करणे.
- जागरूकता वाढवण्यासह अशा घटनांची दखल व मोहिमेचा आढावा.
- सन 2047पर्यंतच्या 'विकसित भारत' संकल्पनेशी सुसंगत मोहीम राबवणे.
- राष्ट्रउभारणीत महिला आणि मुलींच्या संपूर्ण सहभागावर भर.

**मोहिमेच्या केंद्रस्थानी असणारे राज्य**

- सात राज्ये व जवळपास 300 पेक्षा जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत बालविवाहाचे प्रमाण जास्त.
- पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, राजस्थान, त्रिपुरा, आसाम आणि आंध्र प्रदेश या सात राज्यांचा समावेश.

**सामूहिक प्रयत्नांचे आवाहन**

- देश प्रगतिपथावर असूनही बालविवाह रोखण्यात अपयश येत असल्याने जनजागृतीवर भर.
- देश पूर्णपणे बालविवाहमुक्त होईपर्यंत प्रयत्न सुरूच राहणार.
- बालविवाह होणार नाहीत, यासाठी सर्वांनी सतर्क राहावे.
- बालविवाहाच्या प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी केंद्र सरकारकडून मोहीम

*****





# 10. विविधा

## कुकुर तिहार उत्सव



- ❖ कुकुर तिहार हा नेपाळमधील एक उत्सव आहे.
- ❖ हा उत्सव मानव आणि कुत्र्यांमधील विशेष संबंध साजरा करतो. या दिवशी कुत्र्यांना पूजा केली जाते, त्यांच्यावर टिका लावली जाते, गळ्यात झेंडूच्या हार घालून त्यांची पूजा केली जाते.
- ❖ या दिवशी कुत्र्यांना स्वादिष्ट अन्न दिले जाते.
- ❖ पोलीस कुत्रे आणि भटक्या कुत्र्यांनाही सन्मानित केले जाते.
- ❖ या दिवशी कुत्र्याशी अनादराने वागणे पाप मानले जाते.
- ❖ नेपाळमध्ये दीपावलीत दुसरा दिवस कुकुर तिहार उत्सव म्हणून साजरा केला जातो. त्यात मानवाला सुरक्षा प्रदान करणाऱ्या श्वानांप्रती प्रेम आणि आदर व्यक्त केला जातो.

## न्यूयॉर्कमधील शाळांना पहिल्यांदाच दिवाळीची सुट्टी

- ❖ न्यूयॉर्कमधील सार्वजनिक शाळांना इतिहासात पहिल्यांदाच दिवाळीची अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

- यामुळे 1.1 दशलक्षाहून अधिक विद्यार्थ्यांना दिवाळी सण साजरा करता येणार आहे.




- गेल्या वर्षी न्यूयॉर्कच्या गव्हर्नर कॅथी हॉचुल यांनी शहरातील सार्वजनिक शाळांना दिवाळीची सुट्टी देण्याचा निर्णय घेतला होता.
- यानुसार येत्या 1 नोव्हेंबर रोजी न्यूयॉर्क शहरातील शाळा बंद राहणार आहेत.

## युरोपियन मराठी संमेलन पुढील वर्षी इंग्लंडमध्ये




- मराठी समुदायातर्फे आयोजित करण्यात येणारे 13 वे 'युरोपियन मराठी संमेलन' 4 ते 6जुलै 2025 दरम्यान इंग्लंडमधील लेस्टरमध्ये होणार आहे.
- सुमारे 25 वर्षांपूर्वी हॉलंड येथे सुरू झालेली युरोपियन मराठी संमेलनाची परंपरा पुढे चालवायची जबाबदारी मराठी लेस्टरवासीयांनी घेतली आहे.
- कोरोनामुळे 2018 नंतर संमेलन होऊ शकले नाही. त्यामुळेच आता सात वर्षांनंतर होणाऱ्या संमेलनास 'पुनरागमन' असे नाव दिले आहे.
- युरोपातील मराठी भाषकांकरिता संमेलन आनंदाची पर्वणी असून, एकमेकांना भेटण्याची संधी प्राप्त होते. एवढेच नव्हे तर आपल्या आवडत्या कलाकारांना, उद्योजकांना आणि समाजसेवकांना जाणून घेण्याची संधीही लाभते.

- या संमेलनास संपूर्ण युरोपातून जवळपास 700 ते 800 मान्यवर तीन दिवस उपस्थित राहतील.
- त्याहून अधिक रसिकांना पुढील आठ महिने या सोहळ्याची माहिती दिली जाईल.
- संमेलनाच्या भरगच्च कार्यक्रमांमध्ये ख्यातनाम मराठी कलाकारांचे केवळ मनोरंजनाचेच नाही, तर विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींची सामाजिक कार्य, महिला सक्षमीकरण इत्यादी विषयांवर परिसंवाद आणि चर्चा होतील.

## 'फ्रॉम ऑइल टू लिथियम' पुस्तकाचे अनावरण



- प्रसिद्ध ऊर्जातज्ज्ञ कुलदीप गुप्ता यांनी लिहिलेल्या 'फ्रॉम ऑइल टू लिथियम : नेव्हिगेटिंग द फ्यूचर ऑफ एनर्जी' या पुस्तकाचे नुकतेच अनावरण करण्यात आले.
- या पुस्तकात जागतिक ऊर्जेच्या आव्हानांशी वैयक्तिक अनुभवाची सांगड घालणारी आकर्षक कथा वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## महाअन्नकूट उत्सव



- हैदराबादमधील सत्यम शिवम सुंदरम गो निवास येथे महाअन्नकुट उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.
- या वेळी भाविकांनी गायींना चारा भरवला.
- अन्नकूट म्हणजे वास्तवात गोवर्धनाची पूजा होय. प्राचीन काळी हा उत्सव इंद्राप्रीत्यर्थ होत असे. पण वैष्णव संप्रदाय बलवान झाल्यावर इंद्रपूजेचे रूपांतर गोवर्धनपूजेत झाले.
- विविध प्रकारची पक्वान्ने आणि खाद्य पदार्थ तयार करून ते कृष्णाच्या मूर्तीच्या पुढे मांडणे व कृष्णाला त्याचा नैवेद्य दाखविणे याला अन्नकूट म्हणतात.

## हदोती बुंदी उत्सव



- राजस्थानातील कोटा शहरात तीन दिवसांच्या हदोती बुंदी वार्षिक उत्सवाला प्रारंभ झाला. यात सजविलेल्या उंटाची शहर परिसरातून मिरवणूक काढण्यात आली.
- 1995 साली लोकसहभागातून हा महोत्सव सुरू झाला. त्याची रूपरेषा 1995 मध्ये तयार करण्यात आली आणि 1996 मध्ये पहिला बुंदी उत्सव आयोजित करण्यात आला.
- या उत्सवाशी सर्वसामान्यांना जोडण्यासाठी तत्कालीन बुंदीचे जिल्हाधिकारी मधुकर गुप्ता यांनी पुढाकार घेतला होता.
- वर्षानुवर्षे, राजस्थानच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेतील सर्वात उत्सुकतेने अपेक्षित असलेल्या घटनांपैकी एक बनून, या सणाला लोकप्रियता प्राप्त झाली आहे.
- रंगीबेरंगी मिरवणुका बुंदीच्या रस्त्यावरून जातात, ज्यात पारंपारिक पोशाख आणि सामानांनी सजवलेले उंट, घोडे आणि हत्ती असतात. या मिरवणुका राजस्थानचा शाही वारसा दर्शवतात आणि उत्सवाच्या वातावरणात भर घालतात. याची सुरुवात बुंदी शहरातील तारागड किल्ल्यावर गणपतीच्या पूजेने होते.

**महत्व:**

- ✓ बुंदी उत्सव पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि प्रदेशात सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.
- ✓ हे स्थानिक कलाकार आणि कारागीरांना त्यांची कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते, ज्यामुळे पारंपारिक कला प्रकारांचे जतन आणि प्रोत्साहन होते. शिवाय, हा सण जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतो, बुंदी आणि आसपासच्या क्षेत्राच्या आर्थिक विकासात योगदान देतो.

## गोंड राणी दुर्गावती पुतळ्याचे अनावरण



- उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बांदा येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात गोंड राणी दुर्गावतीच्या पुतळ्याचे अनावरण केले.

- महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारात हा पुतळा उभारण्यात आला आहे.
- मध्ययुगीन काळात गोंडवनाची राणी दुर्गावतीने आपले साम्राज्य वाचविण्यासाठी मुघलांशी संघर्ष केला होता.
- राणी दुर्गावती : (५ ऑक्टोबर १५२४ – २४ जून १५६४). सोळाव्या शतकातील गोंडवाना (गडामंडला) साम्राज्याची कर्तृत्ववान व पराक्रमी राणी. त्यांचा जन्म चंदेलवंशीय महोबा येथील राजपूत घराण्यात झाला.
- किरातराय (कीर्तिसिंह) व राणी कमलावती यांच्या त्या एकुलत्या राजकन्या.
- दुर्गावतींना तीरकमठा, तलवारबाजी, घोडेस्वारी, नेमबाजी, गोळाफेक, भालाफेक इत्यादी शस्त्रविद्येचे शिक्षण मिळाले. त्याचबरोबर त्यांनी संस्कृतशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास केला होता.
- दुर्गावती महोबाच्या राजदरबारात राजकुमाराच्या वेषात सहभागी होत.शिकार करणे हा त्यांचा आवडता छंद होता.
- दुर्गावतींनी स पंधरा वर्षे गडामंडलाचा कारभार चालविला. त्यांच्या काळात गडामंडला हे गोंड राज्यातील एक संपन्न व समृद्ध राज्य म्हणून उदयास आले.
- गडामंडलातील सु. १२,००० गावे थेट दुर्गावतींच्या ताब्यात असल्याचे उल्लेख सापडतात. त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी दुर्ग, महाल, तलाव, मंदिर इत्यादींचे बांधकाम केल्याचे अवशेष पाहायला मिळतात. उदा., जबलपूर जवळील राणीतल अथवा राणी तलाव. तसेच त्यांनी इतर राज्यांसोबत व्यापारी संबंध जोपासले होते. गोंडवाना साम्राज्याचा हा सुवर्णकाळ होता.
- राज्यात सुवर्णचलनाद्वारे वस्तुविनिमय होत. दुर्गावतींच्या ताब्यात ५२ गड आणि ५७ परगणे मिळून राज्याचा विस्तार हा सु. ७७,७०० चौ. किमी. पर्यंत होता. तसेच २०,००० घोडेस्वार, १००० हत्ती आणि मोठ्या प्रमाणात पायदळ असे विशाल सैन्य बळ त्यांच्याकडे होते. त्यांनी माळवा प्रदेशातील बहादुरशहा व मिआणा अफगाण यांचा लढाईत पराभव केल्याचे उल्लेख सापडतात (१५५५; १५६०).

## अँजेला मर्केल यांच्या पुस्तकाचे प्रकाशन




- ❖ जर्मनच्या माजी चॅन्सलर अँजेला मर्केल यांच्या 'फ्रिडम' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.
- ❖ या पुस्तकात मर्केल यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील घडामोडींचा आढावा घेतला असून या काळातील जागतिक नेत्यांबरोबरील काही कटू-गोड आठवणीही शब्दबद्ध केल्या आहेत.
- ❖ या पुस्तकात त्यांनी - ब्रेक्झिटबाबतच्या निर्णयाबद्दलही त्यांची मते सविस्तरपणे मांडली आहेत.

## जंगल महाल उत्सव



- ❖ पश्चिम बंगालमधील कोलकाता शहरात सध्या जंगल महाल उत्सव सुरू झाला आहे.
- ❖ यात स्थानिक कलावंतांकडून विविध कला सादर केल्या जातात.

## भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2024

International Film Festival
of India

- ❖ 55 वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 20 ते 28 नोव्हेंबर 2024 या कालावधीत पणजी , गोवा येथे होत आहे.
- ❖ **2024 च्या महोत्सवाची थीम**
  - ✓ **'यंग फिल्ममेकर्स – द फ्युचर इज नाऊ'** आहे, त्यामुळे तरुण रक्ताला प्रोत्साहन देण्यासाठी या वर्षी फेस्टिव्हलमध्ये 'बेस्ट डेब्यू डायरेक्टर ऑफ इंडियन फीचर फिल्म' हा नवीन

- ✓ विभाग आणि पुरस्कार श्रेणी सादर करण्यात आली आहे.
- ✓ भारतातील तरुण दिग्दर्शकीय प्रतिभेची ओळख म्हणून या पुरस्कारामध्ये प्रमाणपत्र आणि ₹ 5 लाखांचे रोख पारितोषिक असते.
- ✓ महोत्सवात 15 जागतिक प्रीमियरसह 81 देशांतील 180 आंतरराष्ट्रीय चित्रपट प्रदर्शित केले जातील.
- ✓ या कार्यक्रमाची सुरुवात श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियमवर प्रसिद्ध संस्कृत श्लोक 'अच्युतम केशवम् राम नारायणम्' या गीतानं झाली.
- ✓ चित्रपट महोत्सवातील चित्रपटांच्या प्रदर्शनाची सुरुवात दिग्दर्शक मायकेल ग्रेसीच्या जगभरात गाजलेल्या 'बेटर मॅन' या चित्रपटाच्या प्रदर्शनानं झाली.

*****


Current Affairs
Daily News
THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
@theofficermentor
@mpscanswerwritingpractice
9665666195 \ 9665288834
THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR
Download Our Free App
अधिकच्या चालू घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी Weekly Current Affairs चे Session आवर्जून पहा.
5/5
DOWNLOAD OUR FREE APP
www.THEOFFICER.in
9665666195 / 9665288834






# 11. क्रीडा

## सिकंदर ठरला 'रुस्तम-ए-हिंद'



- महाराष्ट्राच्या सिकंदर शेखने या वर्षीचा 'रुस्तम ए हिंद' हा किताब पटकावला. अशी कामगिरी करणारा तो महाराष्ट्राचा चौथा मल्ल ठरला.
- पुण्यातील पुनीत बालन समूहाकडून साथ मिळणाऱ्या सिकंदरने बग्गा कोहलीला पराभूत करत हा प्रतिष्ठेचा किताब मिळवला.
- पंजाबमध्ये जालंधर जिल्ह्यातील जांडला येथे ही स्पर्धा झाली.
- विजेतेपदासाठी सिकंदरला मानाची गदा ट्रॅक्टर आणि रोख पारितोषिक मिळाले.
- मागील वर्षी सिकंदरने महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा जिंकली होती.
- **रुस्तम ए हिंदचा किताब जिंकणारा सिकंदर शेख हा महाराष्ट्राचा चौथा खेळाडू ठरला.**
- याआधी **हरिश्चंद्र बिराजदार, अमोल बुचडे, असाब अहमद** या महाराष्ट्राच्या मल्लांनी हा किताब मिळवला होता.

## अंशुल कंबोजचा विक्रम

- हरियाणाचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज याने रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी केली.

YOUR PERSONAL MENTOR



❖ त्यांनी केरळ विरुद्ध च्या एका डावात 10 विकेट घेण्याचा पराक्रम केला .

❖ लाहलीतील चौधरी बन्सीलाल क्रिकेट स्टेडियम मध्ये हरियाणा आणि केरळ यांच्यातील रणजी लढतीत 23 वर्षीय अंशुलने दहा बळी घेतले.

***एका डावात दहा विकेट घेणारा अंशुल तिसराच गोलंदाज***

- ✓ *रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत डावात 10 विकेट घेणारा अंशुल तिसराच गोलंदाज ठरला.*
- ✓ *यापूर्वी जानेवारी 1957 मध्ये बंगालच्या प्रेमांगसू चॅटर्जी यांनी आसाम विरुद्धच्या रणजी लढतीत 20 धावा देत 10 विकेट घेण्याचा पराक्रम केला होता.*
- ✓ *तर नोव्हेंबर 1985 मध्ये राजस्थानच्या प्रदीप सुंदरम यांनी विदर्भ विरुद्ध 78 धावात दहा विकेट घेतल्या होत्या.*
- ✓ *प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये दहा विकेट घेणारा अंशुल एकूण सहावा भारतीय गोलंदाज.*
- ✓ *याआधी प्रेमाँगसू चॅटर्जी, प्रदीप सुंदरम, सुभाष गुप्ते, अनिल कुंबळे ,देवाशिष मोहंती यांनी असा पराक्रम केला होता.*

## डब्ल्यूटीए स्पर्धेत कोको गॉफ विजेती



❖ कोको गॉफने डब्ल्यूटीए फायनल्सच्या विजेतेपदाला गवसणी घातली.

❖ तिने अंतिम फेरीच्या लढतीत ऑलिंपिक पदकविजेती झेंग किनवेन हिच्यावर 3-6, 6-4, 7-6 असा तीन सेटमध्ये रोमहर्षक विजय मिळवला आणि पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकण्याची किमया करून दाखवली.

❖ याआधी 2014 मध्ये अमेरिकेच्या सेरेना विल्यम्स हिने डब्ल्यूटीए फायनल्सचे विजेतेपद पटकावले होते.

❖ 10 वर्षांनंतर कोको गॉफच्या रूपात अमेरिकन महिला खेळाडू विजेती ठरली.

## पंकज अडवाणीचे 28 वे जगज्जेतेपद

❖ भारताच्या पंकज अडवाणीने 28 वे जागतिक विजेतेपद जिंकण्याचा पराक्रम केला.

❖ त्याने जागतिक बिलियर्डस स्पर्धा सलग सातव्यांदा जिंकून हे यश मिळवले.



- त्याने दोहा येथे झालेल्या निर्णायक सामन्यांत इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा 4-2 असा पराभव केला.
- पंकज 2016 पासून जागतिक स्पर्धेत विजेता आहे.
- 2020 आणि 2021मध्ये करोनामुळे स्पर्धा झाली नव्हती. त्याने गुणांच्या स्वरुपात बाजी मारली आहे. त्यात प्रथम दीडशे गुण जिंकणारा फ्रेम जिंकतो. एकूण सात फ्रेममध्ये चुरस होते. त्याने दुसऱ्या फ्रेममध्ये 147 गुणांचा ब्रेक करीत आपली क्षमता दाखवली.

## झेलेन्झी नीरज चोप्राचे प्रशिक्षक



- भारताचा सुपरस्टार आणि ऑलिंपिक सुवर्ण, रौप्यपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने नव्या हंगामासाठी आपले प्रशिक्षक म्हणून चेक प्रजासत्ताकाच्या यान झेलेन्झी यांची नियुक्ती केली आहे.
- 58 वर्षीय झेलेन्झी हे भालाफेकीत आधुनिक काळातील सर्वोत्तम समजले जातात. ऑलिंपिक आणि विश्वविक्रम त्यांच्या नावावर आहेत.
- टोकियो ऑलिंपिकध्ये नीरजने सुवर्णपदकाची कामगिरी, त्यानंतर काही महिन्यांपूर्वी झालेल्या पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत त्याने रौप्यपदक मिळवले होते.
- झेलेन्झी हे नीरजचे आयडॉल राहिलेले आहेत. त्यांनी ऑलिंपिकमध्ये तीन आणि जागतिक विक्रमासह स्पर्धेत विजेतेपद मिळवलेले आहे.
- झेलेन्झी यांनी जर्मनीत 1996 मध्ये 98.48 मीटरचा जागतिक विक्रम केलेला आहे. तो अजूनही कायम आहे.

## हरमनप्रीत सिंग वर्षातील सर्वोत्तम खेळाडू



- आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या (एफआयएच) वार्षिक पुरस्कारांवर भारतीय खेळाडूंची मोहोर ठसठशीतपणे उमटली.
- भारताचा हॉकी कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पी. आर. श्रीजेश यांची अनुक्रमे वर्षातील सर्वोत्तम खेळाडू आणि गोलरक्षक म्हणून निवड करण्यात आली.
- 'एफआयएच'च्या 49 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दोघांच्या पुरस्कारावर शिक्कामोर्तब करण्यात आले. विशेष म्हणजे या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी दोघांची तिसऱ्यांदा निवड झाली.
- यापूर्वी दोघांना 2020- 21 आणि 2021-22 अशी सलग दोन वर्षे हा पुरस्कार मिळाला होता.

***इतर पुरस्कार विजेते खेळाडू***

- ✓ *यिब्बी यान्सेन (सर्वोत्तम महिला खेळाडू, नेदरलँड्स)*
- ✓ *ये जिआओ(सर्वोत्तम गोलरक्षक, चीन),*
- ✓ *सुफायन खान(उदयोन्मुख पुरुष खेळाडू, पाकिस्तान)*
- ✓ *झो डियाझ (उदयोन्मुख महिला खेळाडू, अर्जेंटिना)*
- ✓ *जेरोएन डेल्मी (सर्वोत्तम पुरुष प्रशिक्षक, नेदरलँड्स)*
- ✓ *ॲलिसन अन्नान (महिला प्रशिक्षक)*
- ✓ *स्टीव रॉजर्स (सर्वोत्तम पंच, ऑस्ट्रेलिया)*
- ✓ *सारा विल्सन (महिला पंच, स्कॉटलंड)*

## भारतीय महिला संघ अजिंक्य



- उदयोन्मुख खेळाडू दीपिकाने सामन्याच्या 31 व्या मिनिटाला नोंदविलेल्या एकमेव गोलच्या जोरावर भारतीय महिला संघाने झालेल्या सामन्यात ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या चीनवर 1-0 अशी मात करून आशियाई चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.
- दीपिकाने या स्पर्धेत सर्वाधिक 11 गोल केले.
- भारतीय संघाचे हे तिसरे विजेतेपद ठरले.
- यापूर्वी 2016 आणि 2023 मध्ये भारताने ही स्पर्धा जिंकली होती.
- या कामगिरी बरोबरच भारताने कोरियाच्या कामगिरीशी बरोबर केली.
- कोरियाने देखील तीन वेळा आशियाईअजिंक्यपद स्पर्धा जिंकली आहे.
- आशिया चषक महिला हॉकी स्पर्धा 2024 बिहारमधील राजगिर येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.

**पंत 'आयपीएल'च्या इतिहासातील सर्वाधिक महागडा खेळाडू**



- तडाखेबंद फलंदाज, यष्टिरक्षक आणि कर्णधार अशा विविध भूमिका बजावण्यात सक्षम ऋषभ पंत इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या लिलावातील आजवरचा सर्वांत महागडा खेळाडू ठरला आहे.
- जेद्दा येथे झालेल्या लिलावाच्या पहिल्या दिवशी पंतवर लखनऊ सुपर जायंट्स संघाने 27 कोटी रूपयांची विक्रमी बोली लावली.
- त्याआधी कोलकाता नाइट रायडर्स संघाला गतहंगामात जेतेपद मिळवून देणारा कर्णधार श्रेयस अय्यरला 26 कोटी 75 लाख रूपयांच्या बोलीसह पंजाब किंग्जने आपल्या ताफ्यात घेतले.
- तसेच कोलकाता संघाने वेंकटेश अय्यरसाठी तब्बल 23.75 कोटी रुपये मोजले.

**2024 चे सर्वाधिक महागडे खेळाडू**

1. ऋषभ पंत (27 कोटी) : लखनऊ
2. श्रेयस अय्यर (26.75कोटी) : पंजाब
3. वेंकटेश अय्यर (23.75 कोटी) : कोलकाता
4. अर्शदीप सिंग (18 कोटी) : पंजाब
5. युजवेंद्र चहल (18कोटी) : पंजाब

*****




# 12. पुरस्कार

## पुणे पालिकेला आंतरराष्ट्रीय पुरस्कार



- 'आयईईई स्मार्ट सिटीज टेक्निकल कम्युनिटी'तर्फे आंतरराष्ट्रीय स्तरावर देण्यात येणाऱ्या 'इमर्जिंग इकॉनॉमी - लेगसी सिटीज' श्रेणीतील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पुणे महापालिकेच्या 'पीएमसी केअर' या ऑनलाइन सेवेला प्रदान करण्यात आला.
- थायलंडमधील पटाया शहरात 29 ऑक्टोबर ते 1 नोव्हेंबर दरम्यान 'आयईईई इंटरनॅशनल स्मार्ट सिटीज'ची परिषद झाली.
- या ठिकाणी महापालिका आयुक्त तसेच प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांच्या वतीने फॉक्सबेरी टेक्नॉलॉजिजचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित भार्गव यांनी हा पुरस्कार स्वीकारला.
- या परिषदेसाठी जगभरातून 250 प्रकल्पांची निवड झाली होती. त्यातून अंतिम फेरीसाठी सात प्रकल्पांचे मूल्यमापन झाले.
- यात 'पीएमसी केअर' प्रमाणेच पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या 'पीसीएमसी स्मार्ट सारथी' या दोन प्रकल्पांचा समावेश होता.

**'पीएमसी केअर'मधील प्रमुख सेवा**

- ✓ **तक्रार निवारण**
- ✓ **मालमत्ता करासह मनपाचे सर्व कर ऑनलाइन भरण्याची सुविधा**

- ✓ पाणीपुरवठा बंद राहण्याच्या सूचनेसह इतर माहिती देणे
- ✓ मनपाच्या नागरिकाभिमुख सेवांची माहिती
- ✓ पुणे शहरातील घडामोडींविषयी माहिती देणे

- ❖ पुणे महापालिकेच्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग असावा, महापालिकेच्या विविध सेवा-सुविधा मोबाईल ॲप्लिकेशन आणि पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांना उपलब्ध करण्यासाठी हे 'ॲप' नव्या स्वरूपात विकसित करण्यात आले.
- ❖ या 'ॲप'च्या माध्यमातून तक्रार निवारण, मालमत्ता करासह मनपाचे सर्व कर ऑनलाइन भरण्याची सुविधा, पाणीपुरवठा बंदच्या सूचनेसह पुणे महापालिकेतील घडामोडींची माहिती, नागरिकाभिमुख सेवांची माहिती दिली जाते.

  त्याचा फायदा शहरातील लाखो नागरिकांना होत आहे.
- ❖ या कार्याची दखल जागतिक स्तरावर घेऊन हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## समांथा हार्वे यांच्या 'ऑर्बिटल'ला बुकर




- ❖ ब्रिटीश लेखिका समांथा हार्वे यांना 'ऑर्बिटल' कादंबरीला 2024 चा बुकर पुरस्कार मिळाला आहे.
- ❖ 'ऑर्बिटल' ही बुकर जिंकणारी अवकाश क्षेत्रावर आधारित पहिलीच कादंबरी आहे.
- ❖ 2024 च्या पुरस्कारासाठी विचार झालेल्या लेखकांमध्ये महिलांचे वर्चस्व पाहायला मिळाले.
- ❖ पुरस्काराची रक्कम 50 हजार पौंड इतकी आहे.
- ❖ या कादंबरीच्या कथानकाचा संपूर्ण कालावधी 24 तास आहे आणि तिच्या पृष्ठांची संख्या केवळ 136 इतकी आहे.
- ❖ आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील सहा अंतराळवीर आणि त्यांचा एक दिवसाचा प्रवास या कथेवर आधारित असलेली ही कादंबरी 2024 मधील ब्रिटनमधील सर्वोच्च खपाचे पुस्तक ठरले आहे.

- हे अंतराळवीर पृथ्वीवरील सूर्योदय आणि सूर्यास्ताचे निरीक्षण करतात.
- या कालावधीत ते विविध खंडांवर मार्गक्रमण करतात आणि विविध ऋतू त्यांना पाहायला मिळतात.
- लंडन शहरातील ओल्ड बिलिंग्जगेट येथे 12 नोव्हेंबर रोजी एका समारंभात हार्वे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.
- 'ऑर्बिटल' हे बुकर पारितोषिक जिंकणारे हे दुसऱ्या क्रमांकाचे छोटे पुस्तक आहे.
- परीक्षकांमध्ये ब्रिटिश भारतीय संगीतकार नितीन साहनी, कादंबरीकार सारा कॉलिन्स, 'द गार्डियन'चे फिक्शन संपादक जस्टिन जॉर्डन आणि चिनी अमेरिकी लेखक-प्राध्यापक यियुन ली यांचा समावेश होता.

## कामत यांना इन्फोसिस पुरस्कार



- पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चमधील (आयसर) प्राध्यापक डॉ. सिद्धेश कामत यांना 2024 चे जैवशास्त्रांमधील इन्फोसिस पारितोषिक जाहीर झाले आहे.
- डॉ. कामत यांच्यासह एकूण सहा युवा भारतीय शास्त्रज्ञांना हे मानाचे पारितोषिक जाहीर झाले असून, त्यांपैकी चार शास्त्रज्ञ सध्या विदेशात संशोधन करीत आहेत.
- इन्फोसिस सायन्स फाऊंडेशनच्या वतीने 2024 च्या इन्फोसिस पारितोषिकांची घोषणा झाली.
- विविध क्षेत्रांत जगभरात मोलाचे आणि असामान्य संशोधन करणाऱ्या भारतीय शास्त्रज्ञांची मानाच्या इन्फोसिस पारितोषिकासाठी निवड केली जाते.
- पारितोषिकांचे हे सोळावे वर्ष असून, निवड झालेल्या शास्त्रज्ञांना सुवर्णपदक, मानपत्र आणि एक लाख अमेरिकी डॉलर किंवा तेवढ्या मूल्याची भारतीय रक्कम देण्यात येणार आहे.
- डॉ. कामत यांचे संशोधन मानवी शरीरातील जैवसक्रिय लिपिडवर आहे.
- लिपिड हा नैसर्गिकरीत्या आढळणारा - दीर्घ शृंखलेच्या कार्बनी संयुगांचा वर्ग - आहे.
- शरीरातील स्निग्ध पदार्थ, कोलेस्टेरॉल, पेशींच्या आवरणाचा प्रमुख घटक, चरबी ही लिपिडची काही उदाहरणे आहेत.
- ऊर्जा साठवणे आणि संदेशवहन करण्यातही लिपिड महत्वाची भूमिका निभावतात. त्यांपैकी संदेशवहन करणाऱ्या लिपिडवर डॉ. कामत यांचे संशोधन आहे.
- डॉ. कामत मूळचे मुंबईचे असून, त्यांनी यूडीसीटी येथून बीटेकची पदवी मिळवली. त्यानंतर टेक्सास ए अँड एम विद्यापीठातून त्यांनी पीएचडी पूर्ण केली.

- 2016 मध्ये ते पुण्याच्या आयसर मध्ये संशोधन आणि अध्यापनासाठी दाखल झाले.
- डॉ. कामत यांना स्वर्णजयंती फेलोशिपसह अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

***2024 चे इन्फोसिस पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ –***

*डॉ. सिद्धेश कामत, आयसर, पुणे (जैवशास्त्रे), श्याम गोलाकोटा, वॉशिंग्टन विद्यापीठ (अभियांत्रिकी), महमूद कुरिया, एडिंग्टन विद्यापीठ (सामाजिक शास्त्रे), नीना गुप्ता, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट, कोलकाता (गणित), वेदिका खेमानी, स्टॅनफर्ड विद्यापीठ (भौतिकशास्त्रे), अरुण चंद्रशेखर, स्टॅनफर्ड विद्यापीठ (अर्थशास्त्र).*

## व्हिक्टोरिया थेलविग 'मिस युनिव्हर्स'



- डेन्मार्कची व्हिक्टोरिया केजर थेलविग हिला 2024 चा 'मिस युनिव्हर्स' हा किताब मिळाला आहे.
- मेक्सिकोमध्ये पार पडलेल्या 'मिस युनिव्हर्स' स्पर्धेचे यंदा 73 वे वर्ष होते.
- हा किताब मिळवणारी व्हिक्टोरिया ही डेन्मार्कची पहिलीच विजेती ठरली आहे.
- मेक्सिको सिटी एरेनामध्ये या स्पर्धेचा अंतिम सोहळा पार पडला.
- 'मिस नायजेरिया' चिडिम्मा अॅडेत्शिना दुसऱ्या स्थानी तर मिस मेक्सिको' मारिया फर्नांडा बेल्टरान तिसऱ्या स्थानी राहिली.
- मागील वर्षीची या किताबाची मानकरी निकाराग्वाची शेन्निस पालासियोस हिने व्हिक्टोरियाला मुकुट प्रदान केला.
- मिस युनिव्हर्स 2024’च्या स्पर्धेत भारताचं प्रतिनिधित्व करणारी 18 वर्षांची सौंदर्यवती रिया सिंघा ने केले.
- 73 वी ‘मिस युनिव्हर्स’ स्पर्धा यंदा मेक्सिकोमध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत 125 देशातील स्पर्धकांनी भाग घेतला.
- आपल्या सौंदर्याने मिस युनिव्हर्सचा ताज जिंकणारी 21 वर्षीय व्हिक्टोरिया एक उद्योजिका आणि वकील आहे.

**भारताने तीन वेळा मिस युनिव्हर्स चा किताब जिंकला**

- याआधी तीन वेळा मिस युनिव्हर्सचा खिताब भारताच्या नावावर झाला आहे.
- 1994 मध्ये बॉलिवूड अभिनेत्री सुष्मिता सेननं भारतासाठी पहिल्यांदा हे विजेतेपद पटकावले होते. यानंतर लारा दत्ता(2000) आणि हरनाज संधू (2021)यांनीही हा खिताब पटकवला आहे.

**मिस युनिव्हर्स स्पर्धा:**

- ✓ मिस युनिव्हर्स ही दरवर्षी घेतली जाणारी एक जागतिक सौंदर्य स्पर्धा आहे.
- ✓ सरासरी 60 कोटी दूरचित्रवाणी प्रेक्षक असलेली मिस युनिव्हर्स जगातील सर्वात लोकप्रिय सौंदर्य स्पर्धा मानली जाते.
- ✓ मिस युनिव्हर्स ऑर्गनायझेशन ही अमेरिकेच्या न्यू यॉर्क शहरात स्थित असलेली कंपनी ह्या स्पर्धेचे आयोजन करते.
- ✓ 1952 साली कॅलिफोर्नियाच्या लॉंग बीच शहरामध्ये ही सौंदर्य स्पर्धा सर्वप्रथम भरवली गेली. फिनलंडच्या आर्मि कुसुला यांनी ती जिंकली होती.
- ✓ आजवर सुष्मिता सेन (1994) , लारा दत्ता (2000) व हरनाज कौर संधू (2021) ह्या भारतीय सुंदरींनी ही स्पर्धा जिंकली आहे.
- ✓ अमेरिकेने 7 वेळा, व्हेनेझुएलाने 6 वेळा तर पोर्तो रिकोने 5 वेळा मिस युनिव्हर्स जिंकण्याचा बहुमान मिळवला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ नायजर' पुरस्काराने गौरव



- ❖ पंतप्रधान नरेंद्र मोदी नायजेरिया दौऱ्यावर असून दौऱ्याच्या पहिल्या दिवशी त्यांच्या सन्मानार्थ नायजेरियाच्या स्टेट हाऊसमध्ये आयोजित समारंभात नायजेरियाचे राष्ट्रपती महामहिम बोला अहमद तिनुबू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना, त्यांच्या राजकीय कर्तृत्वाबद्दल तसेच भारत आणि नायजेरियातील संबंध वृद्धींगत करण्यासाठी दिलेल्या सर्वोत्कृष्ट योगदानाबद्दल 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ नायजर' हा नायजेरियाचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.
- ❖ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वात भारताने जागतिक महासत्ता म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले आहे, त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परिवर्तनशील कारभारामुळे सर्वांसाठी एकता आणि शांतता प्रस्थापित केली आहे तसेच परस्पर सामायिक समृद्धी वाढली

आहे, असे या पुरस्कारानिमित्त पंतप्रधानांना प्रदान केल्या केलेल्या मानपत्रात म्हटले आहे.

- 1969 नंतर नायजेरियाच्या या पुरस्काराने सन्मानित केले गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिले परदेशी नेते ठरले आहेत.
- मोदींना देशाकडून देण्यात आलेला हा 17 वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार होता.
- क्वीन एलिझाबेथ या एकमेव परदेशी मान्यवर आहेत ज्यांना 1969 मध्ये  हा पुरस्कार मिळाला होता.
- 17 वर्षात भारतीय पंतप्रधानांनी नायजेरियाला दिलेली ही पहिली भेट आहे.

## गयानाच्या सर्वोच्च पुरस्काराने पंतप्रधान नरेंद्र मोदी सन्मानित



- गयानाच्या संसद सभागृहात एका समारंभात गयानाचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद इरफान अली यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'ऑर्डर ऑफ एक्सलन्स' हा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव केला.
- दूरदर्शी राजकीय नेतृत्व, जागतिक स्तरावर विकसनशील देशांच्या अधिकारांचा पुरस्कार, जागतिक समुदायाची असामान्य सेवा आणि भारत-गयाना संबंधांना बळकटी देण्याची वचनबद्धता याबद्दल पंतप्रधानांचा बहुमान करण्यात आला.
- पंतप्रधानांनी हा पुरस्कार स्वीकारताना, तो भारताच्या जनतेला आणि दोन्ही देशांमध्ये अतिशय खोलवर रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित केला.
- आपला सरकारी दौरा म्हणजे भारत-गयाना मैत्रीला दृढ करण्याच्या दिशेने भारताच्या सातत्यपूर्ण बांधिलकीचा दाखला आहे, यावर त्यांनी भर दिला.
- गयानाचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगातील केवळ **चौथे** परदेशी नेते आहेत.

### 50 वर्षात गयानाला भेट देणारे मोदी पाहिलेच पंतप्रधान

- पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्राझीलमधील जी-20 शिखर परिषद आटोपल्यानंतर  गयानाला पोहोचले. तिथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.
- गेल्या 50 वर्षांपेक्षा जास्त कालावधीत मोदी हे गयानाला भेट देणारे भारताचे पहिले पंतप्रधान ठरले आहेत.

- भारत-गयाना मैत्रीचे प्रतिक म्हणून मोदी यांना जॉर्जटाऊन शहराची किल्ली भेट देण्यात आली

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डॉमिनिकाचा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान प्रदान



- कॉमनवेल्थ ऑफ डॉमिनिकाच्या राष्ट्रपती सिल्व्हानी बर्टन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डॉमिनिकाचा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान "डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर" प्रदान केला.
- हा सन्मान त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वासाठी, कोविड-19 महामारीच्या काळात डॉमिनिकाला केलेल्या मदतीसाठी आणि भारत-डॉमिनिका संबंध बळकट करण्याच्या त्यांच्या कटिबद्धतेसाठी दिला गेला.
- डॉमिनिकाचे पंतप्रधान रूझवेल्ट स्केरिट या कार्यक्रमाला उपस्थित होते.
- पंतप्रधानांनी हा सन्मान भारतातील जनतेला आणि भारत व डॉमिनिकामधील ऐतिहासिक व सांस्कृतिक संबंधांना समर्पित केला.
- तसेच, भारत आणि डॉमिनिकामधील द्विपक्षीय संबंध भविष्यात अधिक मजबूत होतील, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.
- हा पुरस्कार समारंभ 20 नोव्हेंबर 2024 रोजी, गयाना येथील जॉर्जटाउनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या भारत-कॅरिकॉम शिखर परिषदेच्या दरम्यान पार पडला.

## जयसिंगराव पवार यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार जाहीर



- यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार 2024 ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉक्टर जयसिंगराव पवार यांना जाहीर झाला आहे.
- दोन लाख रुपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
- यशवंतराव चव्हाण यांच्या 40 व्या पुण्यतिथी दिने 25 नोव्हेंबरला चव्हाण सेंटरचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे .

- चव्हाण सेंटरकडून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो डॉक्टर जयसिंगराव पवार यांनी महाविद्यालयीन क्षेत्रात इतिहास अध्यापनाचे कार्य केले.
- इतिहास विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची 20 पुस्तके त्यांनी लिहिली आणि ती सर्व महाराष्ट्रभर लोकप्रिय झाली अनेक संदर्भग्रंथ अभ्यासून अत्यंत सोप्या शैलीत इतिहासाची चिकित्सापूर्वक मांडणी या पुस्तकांमध्ये केली असल्यामुळे ती क्रमिक पुस्तके न राहता इतिहास प्रेमींची संदर्भ पुस्तके झाली आहेत.

## 'पीएच.डी.' धारकांसाठी सर्वोत्कृष्ट प्रबंध पुरस्काराची घोषणा

- देशभरातील गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधनाला चालना आणि तरुण संशोधकांकडून होणाऱ्या उच्च दर्जाच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने 'पीएच.डी. सर्वोत्कृष्ट प्रबंध' असा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे.
- या अंतर्गत दरवर्षी विविध शाखांमधील पीएच.डी. प्रबंधांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.
- या पुरस्कारासाठी 1 जानेवारी ते 31 डिसेंबर या कालावधीतील प्रबंध विचारात घेतले जाणार आहेत.
- गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधकांची दखल घेणे हा पुरस्काराचा उद्देश आहे.
- संशोधनाचा अत्युच्च दर्जा, ज्ञान आणि संशोधन पद्धती, स्पष्टता, परिणाम आणि परिणामकारक सादरीकरण, हे घटक विचारात घेतले जाणार

आहेत. पुरस्कार निवडींसाठीची प्रक्रिया दोन टप्प्यात होणार आहे.
- त्यासाठी विद्यापीठ स्तरावर आणि आयोगाच्या स्तरावर निवड समिती असणार आहे.

## रोशडेल पायोनियर्स पुरस्कार




- आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचा सर्वोच्च सन्मान मानला जाणारा रोशडेल पायोनियर्स पुरस्कार नुकताच इंडियन फार्मर्स फर्टिलायझर को-ऑप लि.चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. यू.एस. अवस्थी यांना जागतिक आयसीए

परिषदेत आयसीएचे अध्यक्ष एरियल ग्वार्को यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

❖ डॉ. वर्गीस कुरियन यांच्यानंतर हा पुरस्कार मिळवणारे ते दुसरे भारतीय आहेत.

❖ कुरियन यांना 2001 मध्ये या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते.

❖ डॉ. अवस्थी हे केमिकल इंजिनिअर असून ते 1976 मध्ये इफ्कोमध्ये (इंडियन फार्मर्स फर्टिलायझर को-ऑप लि.)रुजू झाले.

❖ त्यांच्या नेतृत्वाखाली या संस्थेची उत्पादनक्षमता 292 टक्क्यांनी वाढली व निव्वळ मालमत्तेत 688 टक्क्यांनी वाढ झाली.

❖ त्यांच्या दूरदृष्टीने इफ्कोने विविध व्यवसाय क्षेत्रांमध्ये प्रवेश केला; तसेच नॅनो खतांचे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित केले.

**'रोशडेल पायनियर्स अवार्ड'**

- 'रोशडेल पायनियर्स अवार्ड' हा इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्सकडून (ICA) दिला जाणारा सर्वोच्च मानाचा पुरस्कार आहे.
- या पुरस्काराची सुरूवात 2000 मध्ये झाली होती.
- नवकल्पकतेची जोड देऊन संस्थेला आर्थिकदृष्ट्या नव्या शिखरावर पोहोचवण्यासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तीच्या कार्याचा गौरव करणे, हा या पुरस्कारामागील मूळ उद्देश आहे.

## आशा काळे यांना गदिमा पुरस्कार जाहीर



❖ गदिमा प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना 2024 चा गदिमा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

❖ अभिनेत्री प्रिया बेर्डे यांना विद्याताई माडगूळकर स्मृती गृहिणी-सखी- सचिव पुरस्कार, प्रसिद्ध कथा- पटकथा-संवादलेखक व गीतकार क्षितिज पटवर्धन यांना चैत्रबन पुरस्कार, तर प्रसिद्ध गायिका मनीषा निश्चल यांना विद्या प्रज्ञा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

❖ आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 14 डिसेंबर रोजी टिळक स्मारक मंदिर येथे पुरस्कार प्रदान केले जातील.

❖ गदिमा पुरस्कार कवी ग.दि.माडगूळकर यांच्या स्मरणार्थ गदिमा प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येतो.

❖ गदिमा पुरस्काराबरोबरच काही अन्य पुरस्कारही देण्यात येतात. एखाद्या क्षेत्रातील उदयोन्मुख

नवोदिताला चैत्रबन पुरस्कार देण्यात येतो. तर 1995 पासून ग.दि.माडगूळकरांच्या पत्नी कै.विद्याताई माडगूळकर यांच्या नावाने गृहिणी-सखी-सचिव पुरस्कार देण्यात येतो.

- गजानन दिगंबर माडगूळकर(1 ऑक्टोबर 1919 - 14 डिसेंबर 1977) हे विख्यात मराठी कवी, गीतकार, लेखक आणि अभिनेते होते.
- ते त्यांच्या नावाची आद्याक्षरे ग.दि.मा. या नावाने लोकप्रिय आहेत. गदिमांची सर्वात उल्लेखनीय रचना असलेल्या गीतरामायणाची बऱ्याच भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत.
- गीतरामायण या त्यांच्या सर्वात उल्लेखनीय कलाकृतीमुळे त्यांना सध्याच्या काळातील आधुनिक वाल्मिकी देखील म्हणले जाते.

## डॉ. बंग दांपत्याला 'द लिजेंड्स' पुरस्कार



- कर्नाटकातील श्री सत्यसाई विद्यापीठ संस्थानद्वारे सत्यसाई ग्राम, मुदेनहुली, कर्नाटक येथे आरोग्य क्षेत्रातील मानवी उत्कृष्टतेसाठी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय व डॉ. राणी बंग या जोडप्याला 'द लिजेंड्स' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- सत्यसाईबाबांच्या 99 व्या जयंतीनिमित्त 23 नोव्हेंबरला मुधुसुदन साई आणि डॉ.सी.श्रीनिवासन यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- बंग दांपत्याने गडचिरोली जिल्ह्यात ‘सर्च’ संस्थेच्या माध्यमातून गेल्या 38 वर्षात लाखो रुग्णांना वैद्यकीय सेवा, जागतिक मान्यता मिळालेले आरोग्य संशोधन, दारू व तंबाखू कमी करण्यासाठी मुक्तिपथ हा जिल्हाव्यापी कार्यक्रम, युवांसाठी निर्माण व तारुण्यभान हे उपक्रम राबविले आहेत.
- बालमृत्यू कमी करण्याची त्यांनी सांगितलेली पद्धत भारत सरकारद्वारे ‘आशा’ योजनेद्वारे पूर्ण भारतात अंमलबजावणी केली जाते.
- डॉ.अभय व डॉ.राणी बंग यांना यापूर्वी महाराष्ट्र भूषण व पद्मश्री सन्मान प्राप्त असून जवळपास 70 पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.
- ‘टाइम’ मॅगझिनने (अमेरिका) त्यांना ‘ग्लोबल हेल्थ हिरो’ म्हणून 2005 मध्ये सन्मानित केले. तर द लॅन्सेट ने त्यांना ‘द पायोनिअर्स इन रूरल हेल्थ केअर’ म्हणून गौरविले आहे.

## डॉ. माशेलकर यांना 'मानद डॉक्टरेट'



- शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन अकादमीच्या आठव्या पदवी प्रदान सोहळ्यात केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान व भूगर्भशास्त्र मंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना मानद डॉक्टरेट प्रदान करून नुकतेच गौरविण्यात आले.
- डॉ. माशेलकर यांची ही 50 वी मानद डॉक्टरेट असून, ऑस्ट्रेलिया येथील डीकिन विद्यापीठाने माशेलकर यांना त्यांची 49 वी मानद डॉक्टरेट नुकतीच प्रदान केली.
- डॉ. माशेलकर हे देशातील सर्वाधिक मानद डॉक्टरेट असणारे अभियंता ठरले आहेत. त्यांनी डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांचा विक्रम मोडला आहे.

*****




## गरुड शक्ती लष्करी सराव 2024



- भारत-इंडोनेशिया संयुक्त स्पेशल फोर्सेस सराव गरुड शक्ती 2024 च्या 9 व्या आवृत्तीत भाग घेण्यासाठी 25 जवानांचा समावेश असलेला भारतीय लष्कराचा तुकडी इंडोनेशियातील सिजंटुंग, जकार्ता येथे रवाना झाली.
- हा सराव 1 ते 12 नोव्हें. 2024 या कालावधीत आयोजित केला जाईल .
- भारतीय तुकडीचे प्रतिनिधित्व पॅराशूट रेजिमेंट (स्पेशल फोर्सेस) च्या सैन्याने केले आहे आणि इंडोनेशियन स्पेशल फोर्सेस कोपसस द्वारे 40 जवानांचा समावेश असलेल्या इंडोनेशियन तुकडीचे प्रतिनिधित्व केले जात आहे.

**उद्दिष्ट**

- ✓ गरुड शक्ती 24 या सरावाचे उद्दिष्ट दोन्ही बाजूंना एकमेकांच्या कार्यपद्धतीची ओळख करून देणे, दोन्ही सैन्याच्या विशेष दलांमधील परस्पर सामंजस्य, सहकार्य आणि परस्पर कार्यक्षमता वाढवणे हे आहे.
- ✓ या सरावाची रचना द्विपक्षीय लष्करी सहकार्य विकसित करण्यासाठी आणि चर्चा करून आणि सामरिक लष्करी कवायतींच्या तालीमद्वारे दोन सैन्यांमधील संबंध मजबूत करण्यासाठी करण्यात आली आहे.
- ✓ या सरावामध्ये विशेष ऑपरेशन्सचे नियोजन आणि अंमलबजावणी, विशेष सैन्याची कौशल्ये

विकसित करण्यासाठी अभिमुखता, शस्त्रे, उपकरणे, नवकल्पना, डावपेच, तंत्र आणि कार्यपद्धती यावरील माहितीचे आदान-प्रदान यांचा समावेश असेल.

- ✓ संयुक्त सराव गरुड शक्ती 24 मध्ये जंगलाच्या प्रदेशात विशेष सैन्याच्या ऑपरेशनचा संयुक्तपणे सराव करणे, दहशतवादी तळांवर हल्ले करणे आणि लष्करी सहकार्य वाढविण्यासाठी दोन्ही देशांच्या जीवनशैली आणि संस्कृतीची अंतर्दृष्टी प्राप्त करण्याव्यतिरिक्त मूलभूत आणि आगाऊ विशेष सैन्य कौशल्ये एकत्रित करणारा प्रमाणीकरण सराव यांचाही समावेश असेल.
- ✓ या सरावाची ही 9 वी आवृत्ती होती.या सरावाची पहिली आवृत्ती 2012 मध्ये भारतात आयोजित करण्यात आली होती.

**वज्र प्रहार सराव - 2024**




- ❖ भारत-अमेरिका संयुक्त विशेष सैन्य दलाच्या वज्र प्रहार सरावाच्या 15 व्या आवृत्तीसाठी भारतीय सैन्य दल आज रवाना झाले.
- ❖ हा सराव 2 ते 22 नोव्हेंबर 2024 दरम्यान अमेरिकेतील इदाहो मधील ऑर्चर्ड कॉम्बॅट ट्रेनिंग सेंटर येथे आयोजित केला जाणार आहे.

**सरावाचे उद्दिष्ट**

- ✓ परस्पर सहकार्याने केले जाणारे कार्य, संयुक्तता आणि विशेष मोहिमांच्या रणनीतींची परस्पर देवाणघेवाण वाढवून भारत आणि अमेरिका यांच्यातील लष्करी सहकार्याला चालना देणे हे वज्र प्रहार या सरावाचे उद्दिष्ट आहे.
- ✓ या सरावामुळे वाळवंटी आणि अर्ध वाळवंटी वातावरणात संयुक्त विशेष दलाच्या मोहीमा राबविण्याची एकत्रित क्षमता वाढेल.
- ✓ उच्च दर्जाची शारीरिक तंदुरुस्ती, संयुक्त नियोजन आणि संयुक्त रणनीतिक अभ्यास यावर या सरावात भर दिला जाईल.
- ✓ वज्र प्रहार हा सराव दोन्ही देशांना संयुक्त विशेष दलाच्या मोहीमांच्या संचालनासाठी आपल्या सर्वोत्तम पद्धती आणि अनुभव सामायिक करण्यास सक्षम बनवेल.
- ✓ या सरावामुळे दोन्ही देशांच्या सैनिकांमधील आंतर-कार्यक्षमता, सद्भाव आणि सौहार्द वाढवण्यास मदत होईल.

- ❖ याच सरावाची यापूर्वीची आवृत्ती डिसेंबर 2023 मध्ये मेघालयातील उमरोई येथे आयोजित करण्यात आली होती.
- ❖ भारतीय आणि अमेरिकेच्या सैन्यादरम्यानचा हा या वर्षातील दुसरा सराव असेल.

- या आधीचा 'युद्ध अभ्यास 2024' हा सराव सप्टेंबर 2024 मध्ये राजस्थानात आयोजित करण्यात आला होता.

**ऑस्ट्राहिंद संयुक्त लष्करी सराव 2024**




- ऑस्ट्राहिंद या भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या तिसऱ्या संयुक्त लष्करी सरावाला पुण्यामध्ये फॉरिन ट्रेनिंग नोड येथे सुरुवात झाली.
- 8 नोव्हेंबर ते 21 नोव्हेंबर 2024 दरम्यान हा सराव होणार आहे.
- ऑस्ट्राहिंद हा वार्षिक युद्धसराव असून तो भारत आणि ऑस्ट्रेलियात आलटून पालटून आयोजित केला जातो.
- यापूर्वी डिसेंबर 2023 मध्ये हा युद्धसराव ऑस्ट्रेलियात आयोजित करण्यात आला होता.
- भारतीय तुकडीमध्ये 140 लष्करी कर्मचारी असून त्यामध्ये प्रामुख्याने डोग्रा रेजिमेंटच्या जवानांचा आणि भारतीय हवाई दलाच्या 14 कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.
- ऑस्ट्रेलियन लष्करी तुकडीमध्ये 120 कर्मचारी असून त्यामध्ये सेंकड डिव्हीजनच्या 10 ब्रिगेडच्या 13व्या लाईट हॉर्स रेजिमेंटचा समावेश आहे.
- ऑस्ट्राहिंद हा युद्धसराव संयुक्त राष्ट्रांच्या आदेशाच्या सातव्या अध्यायात नमूद केल्यानुसार अर्धशहरी आणि अर्ध-वाळवंटी प्रदेशात संयुक्त पारंपरिक मोहिमांमध्ये आंतरपरिचालनक्षमतेत वाढ करून या माध्यमातून भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील लष्करी सहकार्याला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित केला जातो.
- हा युद्धसराव युद्ध तयारी आणि सामरिक प्रशिक्षण टप्पा आणि सत्यापन टप्पा अशा दोन टप्प्यात आयोजित केला जाईल.
- या युद्धसरावात आयोजित होणाऱ्या ड्रिल्स/ ऍस्पेक्ट्समध्ये दहशतवाद्यांनी ताब्यात घेतलेल्या एखाद्या प्रदेशाच्या मुक्ततेची मोहीम, संयुक्त परिचालन केंद्राची स्थापना, छापे आणि शोध आणि उद्ध्वस्त करण्याच्या मोहिमांसारख्या संयुक्त दहशतवादविरोधी मोहिमांचे आयोजन, हेलिपॅडचे संरक्षण, ड्रोन्सचा वापर आणि ड्रोन

प्रतिबंधक उपाययोजना आणि विशेष हेलिबोर्न कारवायांचा समावेश आहे.

❖ ऑस्ट्राहिंद हा युद्धसराव दोन्ही बाजूंना युद्धाच्या डावपेचांमधील सर्वोत्तम पद्धती, डावपेचांची आखणी करुन राबवल्या जाणाऱ्या मोहिमांमध्ये तंत्रज्ञान आणि प्रक्रियांचा वापर यांची परस्परांमध्ये देवाणघेवाण करण्याची सुविधा उपलब्ध करून देतो.

❖ दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये यामुळे सौहार्द आणि परस्परांविषयी सन्मान निर्माण होईल.

## क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी



❖ ओडिशातील चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी श्रेणीवरून प्रथमच जमिनीवर हल्ला करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे.

❖ हे जहाजविरोधी बॅलिस्टिक क्रूझ क्षेपणास्त्र आहे. त्याची रेंज एक हजार किलोमीटरपर्यंत आहे.

**प्रगत सॉफ्टवेअरने सुसज्ज क्षेपणास्त्र :**

✓ क्षेपणास्त्राने पॉइंट नेव्हिगेशनचा वापर करून आपल्या मार्गाचा अवलंब केला.

✓ वेगवेगळ्या उंचीवर आणि वेगाने उड्डाण करताना आपली क्षमता क्षेपणास्त्रानं प्रदर्शित केली.

✓ या क्षेपणास्त्रात अत्याधुनिक एव्हीओनिक्स आणि सॉफ्टवेअरही आहे.

✓ संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने ओडिशातील एकात्मिक चाचणी श्रेणी चांदीपूर येथून मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचरमधून लांब पल्ल्याच्या लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्राची (LRLACM) पहिली चाचणी घेतली.

✓ रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम आणि टेलीमेट्री यांसारख्या अनेक श्रेणी सेन्सर्सद्वारे क्षेपणास्त्राच्या कामगिरीचं परीक्षण केलं गेलं.

✓ हे क्षेपणास्त्र बेंगळुरूच्या एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट, DRDO आणि इतर भारतीय उद्योगांच्या सहकार्यानं विकसित केलं आहे.

✓ हैदराबादस्थित भारत डायनॅमिक्स लिमिटेड आणि बंगळुरूची भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या कंपन्यानी देखील या प्रकल्पात भाग घेतला.

***क्षेपणास्त्र जहाजावरूनही डागता येणार :***

- *हे क्षेपणास्त्र मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचर वापरून जमिनीवरून आणि युनिव्हर्सल व्हर्टिकल लाँच मॉड्यूल सिस्टमद्वारे फ्रंटलाइन जहाजांना जोडलं जाऊ शकतं.*
- *क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, सशस्त्र दल आणि उद्योगसमूहाचे अभिनंदन केलं.यामुळं भविष्यात स्वदेशी क्रूझ क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमांचा मार्ग मोकळा होईल*

## डीआरडीओकडून भारताच्या पहिल्या लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी



❖ संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) (16 नोव्हेंबर 2024) रात्री ओडिशाच्या किनाऱ्यावरील डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून भारताच्या पहिल्या लांब पल्ल्याच्या ध्वनीच्या वेगाच्या पाच पटींहून अधिक वेगवान (हायपरसॉनिक) क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी केली आहे.

❖ हे `हायपरसॉनिक` क्षेपणास्त्र सशस्त्र दलांसाठी 1500 किलोमीटरहून अधिक अंतरावर विविध प्रकारची स्फोटके, गुप्तचर उपकरणे किंवा इतर युद्धसामग्री (पेलोड) वाहून नेण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

❖ क्षेपणास्त्राचा मागोवा अनेक कक्षांमध्ये तैनात करण्यात आलेल्या विविध श्रेणी प्रणालीद्वारे घेतला गेला.

❖ दूरस्थित जहाज स्थानकावरून उड्डाणासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार या क्षेपणास्त्राने यशस्वी युद्धाभ्यासाचे प्रात्यक्षिक देताना अचूकतेने लक्ष्यभेदाची पुष्टी केली आहे.

❖ हे क्षेपणास्त्र डॉ. एपीजे अब्दुल कलाम क्षेपणास्त्र संकुल, हैदराबादमधील प्रयोगशाळा तसेच `डीआरडीओ`च्या इतर प्रयोगशाळा आणि औद्योगिक भागीदारांच्या सहकार्याने स्वदेशी तंत्रज्ञानाने विकसित करण्यात आले आहे.

❖ ही उड्डाण चाचणी `डीआरडीओ`च्या वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि सशस्त्र दलाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात आली

## अरुणाचलमध्ये संयुक्त सराव



❖ अरुणाचल प्रदेशमधील शी-योमी जिल्ह्यात लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्त सराव केला.

❖ 'पूर्वी प्रहार' नावाच्या या चार दिवसांच्या सरावात गुप्तचर विभागाकडून माहिती घेणे, पाळत ठेवणे, वेगाने जमवाजमव करणे आदी कृती संयुक्तपणे करण्यात आल्या.

❖ सरावात एम- 777, हॉवित्झर तोफेसह पी-8आय विमान, ड्रोन, 'चिनूक' व 'प्रचंड' हेलिकॉप्टरनी सहभाग घेतला होता.

❖ लष्करी पराक्रमाचे महत्त्वपूर्ण प्रदर्शन करताना, भारतीय लष्कर, भारतीय नौदल आणि भारतीय वायुसेनेने संयुक्तपणे अरुणाचल प्रदेशाच्या अग्रेषित भागात पूर्वी प्रहार हा उच्च-तीव्रतेचा त्रि-सेवा सराव केला .

❖ 10 नोव्हेंबरपासून सुरू झालेला हा सराव 18 नोव्हेंबर रोजी संपला आणि जवळपास वास्तविक लढाऊ परिस्थितींमध्ये त्यांचे अतुलनीय युद्ध कौशल्य प्रदर्शित केले.

❖ या मोठ्या प्रमाणावरील संयुक्त सरावाचे उद्दिष्ट लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या लढाऊ परिणामकारकतेला सन्मानित करण्याच्या उद्देशाने या प्रदेशातील आव्हानात्मक पर्वतीय भूभागात एकात्मिक संयुक्त ऑपरेशन्स राबविणे, आंतर-सेवा समन्वय आणि ऑपरेशनल तत्परता वाढवणे.

❖ या सर्वसमावेशक सरावाने गुप्तचर माहिती गोळा करणे, पाळत ठेवणे, टोही करणे, जलद जमाव करणे, तैनाती/पुनर्नियोजन आणि ऑपरेशनल लॉजिस्टिकमध्ये संयुक्त संरचनांची प्रभावीता दर्शविली.

## अण्वस्त्रवाहू के - 4 क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी



❖ भारतीय नौदलाने 27 नोव्हेंबर रोजी के-4 अण्वस्त्रवाहू बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.


- ❖ यामुळे भारताची आण्विक प्रतिकारक्षमता आणि संरक्षणसिद्धता अधिक वाढली आहे.
- ❖ नौदलाच्या 'आयएनएस अरिघात' या अणुऊर्जासंचिलात पाणबुडीमधून हे क्षेपणास्त्र सोडण्यात आले.
- ❖ ते 3,500किलोमीटरपर्यंतच्या लक्ष्याचा भेद करू शकते.
- ❖ ही चाचणी व्यापक आण्विक प्रतिकारक्षमता विकसित करण्याच्या भारताच्या योजनेमधील मैलाचा दगड ठरणार आहे.
- ❖ शत्रूने अण्वस्त्र हल्ला केल्यास याद्वारे त्याला प्रभावी प्रत्युत्तर देता येणार आहे. तसेच सागरी हद्दीच्या पलिकडेही देशाच्या सीमांचे संरक्षण करणे शक्य होणार आहे.
- ❖ घन इंधनावर चालणारे के-4 क्षेपणास्त्र अण्वस्त्रक्षम पाणबुडीवरून सोडले जाणारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र (एसएलबीएम) असून नौदलाला अण्वस्त्रांविरोधात प्रभावी अस्त्र उपलब्ध करून देण्यासाठी त्याची रचना करण्यात आली आहे.
- ❖ ते ज्या 'आयएनएस अरिघात' वरून सोडण्यात आले ती भारताची दुसरी अणुऊर्जासंचिला बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी (एसएबीएन) आहे.

*****


UPSC
MPSC
बॅच सुरु
26 डिसेंबर
2024
THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
Stanford Seed
वैकल्पिक विषय
समाजशास्त्र
विषयाचे महाराष्ट्राचे एकमेव तज्ञ मार्गदर्शक
BATCH AVAILABLE मराठी + ENGLISH
ACHIEVE SOCIOLOGY EXCELLENCE IN LESS THAN
90 Days!
TILL 31 DEC 2024
FLAT 25% OFF
ON ONE TIME PAYMENT
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
Main Course - By Covering all Micro Topics Of Syllabus
Assignments - 650+ प्रश्नांचा उत्तर लेखन सराव
1:1 Personal Mentoring
अमर्याद Watch Time
Target Oriented Monthly & Weekly Schedule
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
अधिकारी वर्गाशी संवाद
Regular Evaluation & Critical Feedback By Amol Sir
Course Validity - 6 Months
FREE DEMO
LECTURES
26 डिसेंबर 2024
रोजी (सायं. 7:00)
Google Meet
LIVE
ON
The Officer Your Personal Mentor, 1st floor,
Palak Heights, Above Hotel Appa,
Near LIC Building (Z bridge side), Alka Chowk,
Narayan Peth, Pune - 30
9665666195 / 9665288834




## महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून पहिले 'कर्णरोपण'




- जन्मजात कर्णबधिर मुलांवरील कर्णरोपण (कॉक्लिअर इम्प्लांट) शस्त्रक्रिया मागील वर्षभरापासून थांबली होती. परंतु, आता या शस्त्रक्रियेचा समावेश महात्मा फुले जनआरोग्य योजनेत करण्यात आल्याने राज्यातील पहिली शस्त्रक्रिया नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) झाली.
- मेडिकल आणि मेयो या दोन्हीसह देशातील निवडक रुग्णालयात 2018 पासून केंद्राच्या एडीआयपी योजनेतून कर्णरोपण शस्त्रक्रिया व्हायची. परंतु, मागील वर्षभरापासून शस्त्रक्रियेसाठी आवश्यक महागडे यंत्र मिळत नव्हते. त्यामुळे शस्त्रक्रिया थांबल्या होत्या.
- परंतु, राज्य शासनाने नुकतेच या शस्त्रक्रियेचा या योजनेत समावेश केला.
- नागपुरातील मेडिकल प्रशासनाने आचारसंहितेपूर्वी या योजनेतील रुग्णांसाठी आवश्यक कर्णयंत्र खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण

केली व अखेर या योजनेतून दोन वर्षीय बालकावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

## आरोग्यसेवा सुधारण्यासाठी एशियन डेव्हलपमेंट बँक चे सहाय्य




- ❖ एशियन डेव्हलपमेंट बँक ने महाराष्ट्रात दर्जेदार आणि परवडणारी तृतीय श्रेणी आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षणामध्ये प्रवेश सुधारण्यासाठी 500 दशलक्ष यूएस डॉलर कर्जाचे पॅकेज वचनबद्ध केले आहे.
- ❖ हे पॅकेज भारतातील राज्याच्या नेतृत्वाखालील आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षण केंद्रे स्थापन करण्यात मदत करेल.
- ❖ हे पॅकेज चार वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास मदत करेल ज्यामध्ये हवामान आणि आपत्ती- प्रतिरोधक, लिंग-प्रतिसादात्मक आणि सामाजिकदृष्ट्या समावेशक वैशिष्ट्ये समाविष्ट आहेत.
- ❖ हे पॅकेज लोकांचा खिशाबाहेरील खर्च कमी करेल आणि दर्जेदार वैद्यकीय कर्मचाऱ्यांची भरती आणि कायम ठेवण्यासाठी धोरणात्मक कृती तयार करेल.

*****

THE OFFICER
Your Personal Mentor

